म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४३८

REFBK-0023405
REFBK-0023405

संदर्भ काव्य
२४३९
२३४०५
३/२/०२

# कांचनसंध्या

बा० भ० बोरकर

REFBK-0023405
REFBK-0023405

मौज प्रकाशन गृह

मौज प्रकाशन : २९५
© बा० भ० बोरकर, १९८१
पहिली आवृत्ती : ३० नोव्हेंबर १९८१
मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत २४ रुपये

चि० दीपक आणि चंद्रनाथ
यांस

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७३९
२३७०५
काव्य ७/यल
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

## अनुक्रम


कांचनसंध्या १
आतला आतला सये २
धुक्यांत शिरल्या भूशिरशिखरीं ३
जळीं असावे कळे दिव्यांचे ४
अपर्ण चाफ्याला तुरे ५
सरोवरासच आग लागली ६
विरहुली ७
भुलवैय्या संसार तुझा रे ८
चांदण्याचा पारिजात माझ्या ९
भाळविती अजुन रंग १०
इथेच या बांधावर ११
थंड वारे १२
क्षितिज १३
लाल जास्वंदीं डहाळी १४
कां ? १५
कुळागर १६
सांत्वना ! १८
कधी कधी १९
कोंभ २०
आता माझा हात रिकामा २१
एक मित्र २२
सहज २३
चल कवडी आण दह्याची २४
पाखरू २६

वीस वर्षांनंतर २७
माझ्या मावळत्या उन्हा २८
सांजावलें दिवसाच हें २९
नक्षत्रांनी बांधुनि कुंतल ३०
खूप या वाऱ्यास दारें ३१
तुझीच हांक अंतरीं ३२
कावळ्यांची अवलाद खुडी ३३
किर्र काजळी गडद ३४
सूर दूरचा अपूर्व ३५
मेहुड्या रंगांत ३६
मागल्या दारांत माझ्या ३७
उन्हांतले सरी! ३८
चाहूल ३९
गीत झालें बापुडें ४०
बघ इकडे बघ तिकडे ४१
रंग संध्याकाळचे ४२
माझ्या माथ्यावर ४३
सोस तूं माझ्या जिवा रे ४४
फार दूर गेल्यामुळे ४५
न्यूयॉर्कमधील चंद्रास ४६
मुद्रा भद्राय राजते ४९
उन्हासारखें सुखहि सांडतें ५०
सर ओसरली जरा ५१
पिशी! ५२

सांज होतां ५३
ज्ञानियाला सोपानाचा ५४
याच निळया डोहाकाटीं ५५
मी इथे निःसंग संगीं ५६
जातां जातां ५७
सुख जालें ५८
जीवघेणा श्वास ५९
वास नाही ज्या फुलांना ६०
मी कशाला गीत गाऊं? ६१
आश्वासन ६२
तोंवर ६३
ओघळती रंग जळीं ६४
तुझ्या रानांत रे ६५
पाऊस श्रावणी ६६
माघी चांदणें ये दारीं ६७
मी तुजसाठी ६८
शैशविंचा व्रण तसाच वाहे ६९
कन्नडसा ७२
ती म्हातारी ७३
ओढाच आहे आटला ७६
कावळयाची तक्रार ७७
मूकस्तंभ राणी! ७९
चिंतनिका ८०
दिसली नसतीस तर ८३

घन वरसे रे ८५
सावळ्या विठ्ठला ! ८६
गंगेंत मी काल सचैल न्हालों ८७
अर्घ्य ८८
संपाती ८९
खंत ९०
एक सांध्यचित्र ९१
विसाव्याचे क्षण ९२
चालीमधली वीज कुठे ती ? ९३
फूलपाखरू उडूं लागतां ९४
निर्झरांच्या गार देशीं ९५
गुलमोहर झडतो माथां ९६
पक्ष्यामागून ९७
भुई झाडाविण सुनी ९८
धुळींतलें फूल ९९
आला ग श्रावण १००
वेदनेची वारुणी १०१
रूपकळा १०२
फलश्रुती १०३
सरतां अज्ञातवास १०३
तया नमो १०५
हिप्पिणी १०६
लोकीं पैका झाला बळी १०७
तू सुखीं गे ऐस राणी १०९

ऋतु हिरवा १२०
काजवे १११
माझे आई बहिणाई ११२
काजळी आभाळ माथां ११३
ये ११४
आग लागो जीवना त्या ११५
नातें ११६
मी चुकलें त्याच्या गावा ११७
तूं शहाणी ११८
येइं घना येइं घना ११९
मीच नेणतों माझ्यामधलें १२०
कणसा आलीं श्रावण-शेतें १२१
गीत माझें गायलों मी १२२
ती तुझी स्मितरेघ १२३
गर्द असुनि ही इतुकी झाडी १२४
जल-द तलावाकाठीं १२५
सांत्वन १२६
निळा निळा दीस १२७
समुद्र बिलोरी ऐना १२८

*काही अभंग*

संधिप्रकाशांत अजून १२९
जगीं कैक झाले १३०
त्याची मज बाई १३०

नाड्यावरी चाले १३१
नाही माझी कांही १३१
वसतीला येतां गोसावी १३२
पहाट ढाळिते १३३
अनायास फिटे ऐहिकांची आस १३४
आयुष्याची आता झाली उजवण १३४
रुचे तें तें करीं १३५
जरेसवें व्याधी १३६
डोळ्यांत प्रकाश पावलापुरता १३६

# कांचनसंध्या

# कांचनसंध्या

पिलांस फुटुनी पंख तयांचीं घरटीं झालीं कुठे कुठे,
आता अपुली कांचनसंध्या मेघडंबरीं सोनपुटें.
कशास नसत्या चिंता-खंती वेचूं पळतीं सौम्य उन्हें,
तिमिर दाटतां बनुनि चांदणें तींच उमलतिल संथपणें.
सलें कालचीं विसरुनि सगळीं भलें जमेचें जिवीं स्मरूं,
शिशुहृदयाने पुन्हा एकदा या जगतावर प्रेम करूं.
उभ्या जगाचे अश्रु पुसाया जरी आपुले हात उणे
तरी समुद्रायणीप्रमाणें पोसूं तटिंचीं म्लान तृणें.
इथेच अपुली तीर्थ-त्रिस्थळी वाहे अपुल्या मुळीं-तळीं,
असूं तिथे सखि! ओला वट मी आणिक तूं तर देव-तळी.
शिणुनी येती गुरें-पाखरें तींच लेकरें जाण सखे,
दिवस जरेचे आले जरि त्यां काठ जरीचा लावुं सुखें.

बेतीं आल्त, २४-७-७९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
23004
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

## आतला आतला सये

आतला आतला सये काळोख मातला
विळखा घातला मज काळियाने

नाग झाला सूळ माझें नासिलें गे कूळ
मज माझें मूळ पण गवसलें

आटली अवस, मुळीं पेटला दिवस
रत्नांचा पाऊस अंगीं ओसंडला

आता माझ्या प्राणा झाला कालियाच कान्हा
त्रिभुवना पान्हा नेणें झाल्यें कैशी

मुंबई, ३१-१२-७०

# धुक्यांत शिरल्या भूशिर-शिखरीं

धुक्यांत शिरल्या भूशिर-शिखरीं
धवळारांच्या कडा उजळल्या;
अचल बिलोरी जळीं उमलल्या
फुलचांदीच्या चार साखळ्या;

दोन शिडाऊ भिडुनि तारवें
फुललें त्यांतुन फूलपाखरू,
पाणथळी पुळणींत पांढरें
किरणजाल लागलें विस्तरूं;

शिशिरागमिंच्या सवणाऱ्यांच्या
रेतीमधल्या सहस्र लाह्या
क्षणीं पाकळ्या बनुनि लागल्या
हवेंत लवलवुनी विहराया;

रजत-पिसोळें मन हें झालें,
मला न पुसतां त्यांत मिळालें,
पहाट ही हिमशुभ्र मराळी,
मनहि शुभ्र, मजहुनि निराळें.

मुंबई, ५-१-७१

# जळीं असावे कळे दिव्यांचे

जळीं असावे कळे दिव्यांचे तसें हवेचें तळें,
पुणें रात्रिचें मला भाळवी त्याच्याहुनि कोवळें;
अशा सुवेळीं विधु मज नेई विठ्ठलवाडीकडे
तिथे चांदणें फुलवित राही छायांचे केवडे;
निळावतीच्या तटीं शिळांची मुकाट कासवकुळें,
चिंतनगहिऱ्या झाडांमधुनी शीतळ पारा गळे;
स्तोत्र होउनी तिथे कुणाचा गगनीं गेला गळा :
बसल्या ठायीं रखमाईसह विठ्ठल मज भेटला.

शिवाजीनगर, ९-१-७१

## अपर्ण चाफ्याला तुरे

आले अपर्ण चाफ्याला तुरे पांढऱ्या फुलांचे :
मला आठव दाटले माझ्या पांगल्या मुलांचे;
वाकलेल्या वास्तूसवें एकाकी मी नित्य जागा,
गता-अनागतामध्ये गाढ जोडूं पाहें धागा;
अट्टाहास चालेल हा चाले जोवर रहाट
त्याचमुळे संध्याकाळ मला अद्‌भुत पहाट;
पहाटेला येती फुलें : डोळां गोळा होती मुलें,
चाफ्यापरी माझींसुद्धा खोल खोल जाती मुळें.

बोरी, ३१-१-७१

# सरोवरासच आग लागली

सरोवरासच आग लागली, ज्वाळा झोंबति हंसा :
देव असो की दैव असो, त्या कुणी न पावे नवसा.

चेतव चेतव केतव-वन्ही : आग विझे आगीने :
जागेवरती जागा त्याची, जाग दुगुण जागीने.

उपजत ज्याला पंख तयाला गगनांतच रे थारा
हें नुमजे तो जिथल्या तेथे बेचीराख बिचारा.

ज्वाळांतुन घे प्राक्तन वाचुन त्याचा तूच प्रवक्ता,
आतिल ज्वाळा झेली त्याला वरचा रस्ता उक्ता.

बोरी, १४-२-७१

# विरहुली

घोळव साजणयाद विरहुली
मिळेल त्यांतच दाद विरहुली
सादच गे पडसाद विरहुली
हाच सुखद संवाद विरहुली

आषाढाचा मेघ विरहुली
त्यांतच उजळे रेघ विरहुली
धरेस पडतां भेग विरहुली
वरवर्षेला वेग विरहुली

घाय आपुला गाय विरहुली
खिरे आसवीं साय विरहुली
जळतां ज्योती धाय विरहुली
साजण मग न समाय विरहुली

बोरी, १४-२-७१

# भुलवय्या संसार तुझा रे

भुलवय्या संसार तुझा रे, फुलाफुलांत कट्यार,
रूपगंधयुत वार, साजणा, चिरीत जाय जिव्हार;

वार न हा उरिं फाळ, जिवलगा, भिजून चुनडी लाल,
न्हाउन आल्यें जाळ, या क्षणीं तूच मार वा पाळ;

जास्वंदीचें फूल आज मी मला न भिववी सूळ,
तुझीच रे चाहूल घेउनी कापुन आल्यें मूळ;

ऐस कितीही दूर, बैसला तुझाच जीवीं सूर,
न सहे जरि काहूर तरी मज करिशिल तें मंजूर;

राजपुतानी नार, मिळाला आंदण मज जोहार,
सरणावर मी स्वार—प्रमाथी माझाही शृंगार.

बोरी, ९-३-७१

# चांदण्याचा पारिजात माझ्या

चांदण्याचा पारिजात माझ्या ओसंडे अंगणीं,
माझा बन्सीधर जागा दुधीं न्हाल्या वृंदावनीं;
मोगरीच्या कळ्यांतून तेवल्या ग फुलवाती
माझ्या गोऱ्या गोविंदाला ओवाळाया घृतारती;
दहिवर झालें गोळा, कालवितें दहीरोहे,
वाटे पारावार सारें पारा पाघळीत वाहे.
होतें जी मी याज्ञसेनी आज चांद्रसेनी झालें,
माझ्या रित्या ओंजळींत उभें वैकुंठच आलें.

बोरी, ९-३-७१

## भाळविती अजुन रंग

भाळविती अजुन रंग, केळविती अजुन सूर,
पांगुळले पाय तरी नेत्र लागलेत दूर;
रान वाळलें तरिही धारेला दुगुण वेग,
आटे जळ तेंहि चढुन ओलवितें सगुण मेघ;
स्नेह पांगले तरिही हृदय नसे कधिच रितें :
चंद्राविण चंद्रमण्या स्मरणच आणी भरतें;

दुभणारें जीवन हें मरणा उःशापच हा,
माझ्या सुकुमार मना ! भुलत असा उडत रहा।

बोरी, १०-३-७१

इथेच या बांधावर होतों बसलों हिरव्या वयीं
बघत उगवत्या शेतांमधली पहाट ज्योतिर्मयी;
करांत होती 'ऋग्वेदीं'ची 'अभंगगीतांजली',
कृषिकयुवतिंच्या बिंबांनी पण भरली नेत्रांजुळी;
तो कुणि अनुभववृद्धा गेली छेडुन मिस्किलपणें,
फाव्यासम भावलें तिचें मज चोरखणांतिल जिणें.

सरली नडणी, आज खाचरीं लुवणी-मळणी सुरू,
सोनभुईवर छत्र किरमिजी सांज लागली धरूं;
त्या युवतींच्या नाती : दाणे टिपणारीं पाखरें,
मीहि छेडितों त्यांस कौतुकें त्या वृद्धेच्या स्वरें;
करीं न पुस्तक, चित्तच अवघें अशब्द गीतांजली,
आशीर्वचनें भरुन वर्षते कृतार्थ नेत्रांजुळी.

बोरी, १८-४-७१

## थंड वारे

थंड आले तीव्र वारे : अत्तराचे की फवारे,
पंखसें व्योमीं उडाले मृत्तिकेचे ध्यास सारे;
पावसाची ही निशाणी खेळवी गात्रांत पाणी,
पाखरांनी उंच नेलीं पुष्पपात्रांतील गाणीं;
गोपुरां, सौधां, मिनारां कोवळा मीना उन्हाचा,
पाहुण्या मेघांतुनी ये साद हा आश्वासनाचा;

शोक सारे श्लोक झाले, रंग सारे चिंब ओले,
तृप्तिचा अंदाज घेती आज माझे श्रांत डोळे.

नवी दिल्ली, २-८-७१

# क्षितिज

वर्षे मागे फिरत असतात,
क्षितिज मात्र पुढेच जातें,
त्याचें माझें नातें असें—
वेल माझी आभाळ न्हाते;

फुलांत त्याचे रंग चिंब,
गंध गंध होते माती,
आनंदाला पंख फुटून
अंगभर त्यांचींच पातीं;

वारे वळतात मोर होऊन,
मेघ चळतात अमृत पिऊन,
पांढऱ्या काळया वेळा फुलतात
फूलपाखरी वस्त्रें लेऊन;

उत्सव असा उरांत दाटून
फुलीं असा फुटून येतों,
नक्षत्रांचें विराट मोहळ
उत्तररात्रीं कवेंत घेतों;

तुला कसें कळत नाही ?
फुलत्या वेलीस वय नाही !
क्षितिज ज्याचें थांबलें नाही
त्याला कसलेंच भय नाही,
त्याला कसलाच क्षय नाही.

नवी दिल्ली, ७-८-७१

## लाल जास्वंदी डहाळी

लाल जास्वंदी डहाळी तशी मेघाली लांबली,
विस्मयाने बुजलेली कोर चंद्राची थांबली,
नभीं चाकाटलीं भिरीं, दिशा झाल्या गोऱ्यामोऱ्या,
शाखांतळीं सैल झाल्या सुखें झोपाळयाच्या दोऱ्या,
चंगीभंगी पतंगांची चुरशीची काटाकाट,
चोरपावलां फावली अंध आडोशाची वाट...

चोळामोळा आठवणी चोरून मीं केल्या गोळा :
माझ्या विशीला भेटलीं पुन्हा तुझीं वर्षें सोळा.

नवी दिल्ली, ८-८-७१

# कां ?

पंथ आज थांबला संथ या तळ्याशी,
भाव आर्त कोंडले दाटले गळ्याशी !
कां दिशा सुन्या अशा, खिन्न शुक्रतारा ?
कां पुनश्च घालितो तीच शीळ वारा ?
कां जुनेच शब्द ते घोकतात पानें ?
कां बनांत वाजतें तें तुझेंच गाणें ?
कां तमीं उसासते क्षीण रातराणी ?
कां जमे खुळें असें लोचनांत पाणी ?
कां जळीं स्मितें तुझीं शिंपितात चांदी ?
कां अशी पुन्हा पुन्हा ढासळे समाधी ?
भाव नावरून कां कोसळे पहारा ?
भस्म माखुनीहि कां पेटतो निखारा ?

नवी दिल्ली, ८-८-७१

हे कुळागरांतिल वृक्ष सदोदित ताजे,
जळ निर्मळ येथे अविरत झुळुझुळु वाजे,
लडिवाळ उन्हाचा लपंडाव छायांशी
मन सहजपणाने खिळवुन ठेवी माझें.

पाखरें दूरचीं ऋतु साधुनिया येती
अन् गातां गातां जीव सुरांवर नेती,
कधि लपून पानीं घालिति साद फुलांना :
तीं जाग येउनी पहाट प्राशुनि घेती.

केळींत सांडती कधि चाफीं सोन्याचीं,
फणसांत मोहळें घमघमती लोण्याचीं,
आंब्यांत लागती पिकूं सांजचे रंग
अन् सर्वेच्च उमले मुखनक्षी चान्यांची.

पाटांत पोफळें वाहतात नारिंगी
अन् अळवावरती सांडी स्वर्ण सुरंगी,
वय-रूप न गणितां गोरखतरुचें येथे
कवटाळी त्याला वेल कुणी नटरंगी.

निवडुंग असो वा झुडुप कुणी काटेरी
त्यांभवति पिसोळीं धरिती फेर रुपेरी,
चांदण्यांत बहरे लळा असा सगळ्यांचा
की लेकींचा हा दिवाळसण माहेरीं.

नावास्तव येथे न अडे प्रेम कुणाचें
वा बरसाया तें न लगे गणित गुणांचें,
विसरांत पार या अपार सेक सुखाचा :
न कळतांच माझे सरती शीण मनाचे.

नवी दिल्ली, १८-८-७१

## सांत्वना !

आग्रहें झालों तुझ्या गे मीच मातें पारखा,
फक्त हा संसार केला चारचौघांसारखा;
भास मोठे जाळुनी मीं पथ्य सारें पाळिलें,
पंख बुद्धया तोडुनी अन् स्नेहपंखे ढाळिले;
घेतलें आकाश जैसें झेपलें या कुंपणा,
कोंडिल्या फ्रेमींत कांही सृष्टिच्या खाणाखुणा :
त्यांतल्या मी पाखरांचें गीत केव्हा ऐकतों,
पांगळ्या पायींच केव्हा पर्वताग्रें लंघितों;

रक्त माझें फक्त आता पोळणारी वंचना,
नेटका संसार केला हीच वेडी सांत्वना !

नवी दिल्ली, १८-८-७१

## कधी कधी

कधी कधी तुझे डोळे निळया तळ्यांतले कळे :
कधी तुझ्या ओठांतून मध फुलांतला गळे;
कधी कधी तुझें मौन समई की देवळांत :
कधी कधी तुझें स्मित पुनवेचा पारिजात;
कधी कधी वज्रदीप्ती तुझा अर्धामुर्धा शब्द :
क्षणीं उजळून जाई माझें युगांचें प्रारब्ध;
कधी कधी तुझें आसूं मूळ गंगेची कावड :
मला लाविते जन्माची गूढ व्यथेची आवड;
कधी कधी तुझा वास थंड होणाऱ्या साईचा,
कधी कधी तुझा हात जसा असावा आईचा.

बोरी, १८-८-७१

मोकळ्या कराया आखडलेल्या संधी
"चल," हिला म्हणालों, "हिंडुनि येऊं बांधीं."
बोलांविण होती चाल शुष्क झालेली :
गोठली हिवें की फुलांवेगळी फांदी.

झावळांत होती अजून थोडी सांज,
पाण्यांत मंदशी कुठे कुठे किरमीज,
गडबडुन विखरलें एक भिरें आकाशीं
तो गर्द वनांतुन धडकुन गेली वीज.

सरसरून आला गार झोंबरा वारा,
सडसडून गेल्या चार खिलाडी धारा,
निमिषांत तदा खांद्यास भिडुनिया खांदा
हाडांतुन फिरला चपळ कोवळा पारा.

न कळून गुंतले सहज आमुचे हात,
उमललों बहरलों भिजलेल्या वस्त्रांत;
पाऊस भोगितां उमगुन चुकलें आम्हां
हाडांसहि कैसे कोंभ नवे फुटतात.

नवी दिल्ली, १९-८-७१

## आता माझा हात रिकामा

आता माझा हात रिकामा
एक कवडसा त्यावर खेळे,
बाळपणींची परी परिंदी
त्यांत मनस्वी घेते झेले.

याच रिकाम्या कधि हातावर
बसे कुणी चिमणी स्वच्छंदी
बागडुनी अन् त्रिपदलिपीची
रेखुनि जाते अजीब मेंदी.

या हातावर जमती केव्हा
चंद्राचीं आनंद-आसवें :
विस्मित होउनि बघत राहतों
पण कोणाचीं तें न आठवे.

कुरवाळित तो अपुल्या हातें
देव उशाशी हासत बसतो,
डोळ्यांवरती येतां झापड
त्यावर अपुलें स्वप्न रेखतो.

नवी दिल्ली, १९-८-७१

## एक मित्र

एक माझा मित्र आहे अगदीच साधाभोळा
भोळेपणीं पण त्याच्या कळा ओसंडती सोळा;
माणसांशी बोलतांना शब्दाशब्दाशी गोंधळे
पण मातीशी बोलतां त्याचा दिवस मावळे;
त्याच्या हातीं वळून ती कधी फूल कधी वेल :
नेम नाही रसश्री ही कुण्या चित्रें पालवेल;
सारीं धरित्रीचीं स्वप्नें त्याच्या हातून बोलती,
भूतभविष्याचीं दारें साध्या स्पर्शानें खोलती;
असा मातीचा हा राजा जगांत या परदेशी,
हाटीं भेटलेला ठग जातो पाडून त्या फशीं;
तरी माझा मित्र भोळा त्याचें कौतुक सांगतो,
त्रस्त होतां मातीच्याच पण कानाशी लागतो;
त्याच मातीच्या वराने त्याला नाही कांही कमी,
त्याच्या हातीं तिचें स्वप्न नवें उमले नेहमी.

नवी दिल्ली, १९–८–७१

# सहज

एक कावळा उडून गेला,
एक डहाळी झुलत राहिली,
फुलें जांभळीं तिचीं मुलायम
झडतांना मीं सहज पाहिलीं.

इंद्रचापसी फेक दृष्टिची
फुलांतुनी मेघांत रिघाली :
खुपून होती सुई उरीं जी
ती त्यासरशी सहज निघाली.

नवी दिल्ली, २०-८-७१

# चल कवडी आण दह्याची

मी मुशाफरीस निघालों,
चल कवडी आण दह्याची :
होईल डरीं ती माझ्या
पाकळी तुझ्या हृदयाची.

राहुं दे वळकटी-लोटा,
कां वृथा उद्याचें ओझें ?
पाऊल पडेल जिथे हें
भेटेल कुणी मज माझें !

जें प्रेम तुझ्यावर केलें
तें पालवलें भवताली,
सुखछत्र जाहलें माथां
अन् पायतळीं मखमाली.

जरि रान भेटलें वाटे
तें तुझेंच गाइल गान,
जपतील उशाशी पानें
अन् तुझेच पंचप्राण.

मग नसती भीति कशाला ?
मज आशीर्वचन दिशांचें,
अव्याहत पंखां-प्राणां
आवाहन आकाशाचें.

मज सरता करुं दे आता
हा शेष प्रहर दिवसाचा,
क्षण येइल जो सामोरा
तो जाण लाख नवसांचा.

जें त्राण आज या पंखीं
तव वरस्याची पुण्याई,
घेऊन झेप आकाशीं
मज होऊं दे उतराई.

नवी दिल्ली, २५-८-७१

## पाखरू

पाखरू माझें प्रकाशवेडें फिरकून गेलें वनांत,
सांजचें आकाश हरखून रंगांत सांडलें माझ्या मनांत.
पाखरू माझें लांबून येतां सृष्टीस आला ऋतू,
थांबून राहिला आनंद माझ्या कण्यांत गेला उतूं.

बोरी, २८-११-७१

# वीस वर्षांनंतर

सांज अंधारून येतां : सांडतां पाण्यांत कुंकू
भासलें सिंदूर भांगीं घालुनी आलीस जिंकूं;
कुंतलांच्या स्रोतपातीं वाटलें कृष्णेंत न्हालों
तो तुझ्या ताराकटाक्षें मी पुन्हा घायाळ झालों.

ऐकिलीं ओघीं तुझीं तीं कानडी श्रीरंगगाणीं :
भाळला भामेस कैसा मुक्त तो सारंगपाणी.
वीस वर्षांमागचीं जीं वाहिलीं गीतें तुला मीं
वाजलीं वीणारवीं तीं गायिल्यावाचून रोमीं.

तेधवा होतीस श्यामा कोमला नित्याभिरामा,
पेटुनी झालीस कैसी काल माझी सत्यभामा ?
चालतां माडांमधोनी पौर्णिमेचा चंद्र आला,
भेटुनी खांद्यास खांदा लागला अन् गाल गाला.

आणि दारीं पोचतां, तू पूर्णिमा घालून पाटीं
वेंघुनी छायेंत पोटीं घेतलें प्राशून ओठीं...
कां दिलीं वाळूं वयाचीं वीस वर्षें सांग वाया ?
थांग लागेना तरीही तृप्त माझी श्रांत काया !

बोरी, २-१२-७१

माझ्या मावळत्या उन्हा हास पहाटेचें हसूं,
थकलेल्या फुलपाख्या दे रे खांदीं सुखें बसूं.
संगतीला आल्या गुरा संथ करूं दे रवंथ,
क्लांत कुशीच्या जळांत निळें बिंबूं दे अनंत.
शिणलेल्या पावलांना वाट होऊं दे रे सोपी,
चार क्षणीं त्रस्त चित्ता स्वस्थ जाऊं दे रे झोपीं.
जातां जातां माझ्या उन्हा सांड चोहींकडे सोनें,
उमलूं दे पानीं-फुलीं चार उरलेलीं स्वप्नें.
सावल्यांच्या मांडवांत गड्या लाव लक्ष वाती,
येत्या सामोऱ्या रात्रीला लखख घडूं दे आरती.

बोरी, ७-२-७२

# सांजावलें दिवसाच हें

सांजावलें दिवसाच हें—झडती सरी, झडती सरी,
राजांगणीं झालें तळें अन् चिंब माझी ओसरी.
नावा न येथे कागदी वा धावणारीं पावलें :
पैसावलीं केव्हाच तीं, मन पानसें ओलावलें.

या कागदीं न ठरे दिठी, कविताक्षरें होती अधू,
ओठांतला बोटांमधें जिथल्या तिथे थिजतो मधू.
सांभाळिले कपटे जुने कापून ही रचिते घड्या
जोडून ज्या शिविते नव्या नाना खणांच्या गोधड्या,
रंगांत त्यांच्या मग्न ही गुडघ्यांतली कळ विस्मरे,
पिकल्या फळाचा गोडवा हिचिया मुखावर मोहरे.

रुजतां इथे हिज लाधलीं शब्दांपलीकडलीं गुजें,
शब्दांअलीकडल्या जगीं माझेंच जग मजला दुजें.

मुंबई, ११-४-७२

# नक्षत्रांनी बांधुनि कुंतल

नक्षत्रांनी बांधुनि कुंतल रात कोवळी निळी
तलावांत मुखबिंब लोकिते पाय टाकुनि जळीं
घे पदराने विंझणवारा करून चोळी ढिली;
हुरळुनिया मोगरा बहरला कळीकळीला खळी.
उभेच काठीं थकुनि पेंगती दुधी विजेचे दिवे,
थव्याथव्यांनी उवडझापती झाडींतुनि काजवे,
चर्मतंतुवर कुणी मांडकी खर्ज छेडिते नवा,
हवेंत न कळे कसा उसवला मृद्गंधी गारवा:
खचित कुठे तरि या वाऱ्याला सर गेली खेटुनी;
किती उन्हाळे सुकेच गेले सखि तुजला भेटुनी!

बोरी, १९-४-७२

खूप या वाड्यास दारें : एक याया कैक जाया,
दो घडी येतात तेही लावुनी जातात माया.
पाखरांची मुक्त मांदी गात ये आल्हाद-नांदी,
अंगणीं तालांत डोले एक न्हाती शुभ्र फांदी;
गोठणीसाठी गुरांची सावलीशी गर्द दाटी :
कोण मायेने कुणाशी पाठ घाशी, अंग चाटी;
पंढरीचा पांथ दारीं गोड छेडी एकतारी
साधते त्याच्या अभंगें बैसल्या ठायींच वारी;
कावळा सांगून जातो पाहुणा येणार आहे,
त्यामुळें घासांत माझ्या अमृताची धार वाहे;
आणखी रात्रीं, पहाटे चांदणें शेजेस येतें
अन् फुलीं वेढून मातें स्वप्निच्या राज्यांत नेतें;
आप्त सारे भेट घेती जे तिथे वस्तीस गेले,
सांगतों मी त्यांस किस्से पाहिलेले, ऐकिलेले;
मी खरा तेथील वासी : हा न वाडा, ही सराई,
पाहुणा येथे जरी मी जायची मातें न घाई.

बोरी, ११-५-७२

# तुझीच हाक अंतरीं

तुझीच हाक अंतरीं श्रवून मी पिसावलें,
तुझाच वेध घेत मी जनावनांत धावलें;
वनांतली तुझी दया, प्रसाद चांदण्यांतला,
उन्हांतली प्रसन्नता, निवांत अन् वनांतला,
अशांति सागरांतली, निमग्नता तमांतली,
दिनान्तिची विषण्णता, अगाधता निशेतली...
अशा तुझ्या कळांत मी सचैल चिंब नाहलें,
जिवा जिवांतल्या तुझ्या मनोव्यथेंत पाहलें;
तुझ्या सुरांमुळे सख्या व्यथेंत मी सुखावलें,
पिसावलेपणीं अशा तुझ्या कुशीं विसावलें.

बोरी, ८-७-७२

# कावळ्यांची अवलाद खुडी

कावळ्यांची अवलाद खुडी मिरचीचा वाफा,
पोरी गावच्या भवान्या ओरबाडतात चाफा;
ताज्या दुधामासळीला सोकावली मनीमाऊ,
झालीं साखर नि गूळ मुंग्याडोंगळ्यांचा खाऊ;
जिथे दाणा तिथे घुशी, ताटीं माशी आशादुशी,
ढेकणांनी केली अदा कधी गादी कधी उशी;

त्यांच्या छळवादामुळे लागे करावी बायको
तीच शिंगें काढी तेव्हा वाटे संसारच नको.

बोरी, ९-७-७२

# किर्र काजळी गडद

किर्र काजळी गडद पावसीं हवा हलावी हिवें,
स्वतःत असतां चूर सुरांतुन कांहि उलावें नवें;
दूर जळावा दिवा, घुमावे तुळईवर पारवे,
अंगणांतल्या फांद्यांमधुनी चमकावे काजवे;
करील उन्मन असा धुपावा ऊद कोपऱ्यामधे,
देवघरांतिल गळा आइचा भिजत असावा मधें;
ओल्या चिखलांतिल दाण्यासम जुनी रुजावी व्यथा
तिच्या किसलयांतुन उसवावी मुक्या जगाची कथा.

बोरी, ९-७-७२

## सूर दूरचा अपूर्व

सूर दूरचा अपूर्व शरसा उरिं लागे
अवचित अति विकल चित्त चिरविनिद्र जागे

रंगोत्सव मावळला
मिटत जाय फूल-मळा
भिजलेली भुइ भरली झडलिया परागें

काजळली निशि निवांत
वाळूवर जळ अशांत
माडांतुन पवन विमन भ्रमतसे विरागें

घर मिटे तमांत दाट
विळखे पायांत वाट
घरंगळती भवतीचे चिवट जिवट धागे

खिळल्यागत निश्चळ मी
उत्तरविधुसम जखमी
अनुभवितों सुखविराम विरुनि 'पुढे', 'मागे'

मडगाव, १४-७-७२

# मेहुड्या रंगांत

रामपारीं आरवाने कंठ माझा कोरडा
फाटतां, अंधारवृक्षा तत्क्षणीं गेला तडा;
सावळ्या वर्णांत माझ्या वीज जेव्हा पेटली
जान्हवी आकाशवर्षा या जगाला भेटली;
ठेंगण्या काष्ठें नि माझ्या विप्लवीं घेतां उडी
तेंच झालें यज्ञजिव्हा ताडमाडाएवढी;
अक्षरीं नक्षत्रचित्रें त्या प्रकाशीं पाहिलीं
त्यांत माझीं सर्व व्यंगें सार्थतेला पावलीं;
भस्म त्यांचें माखुनी मी अंबरीं झेपावलों,
मेहुड्या रंगांत आता न्हाउनी हा राहिलों.

वोरी, २४-९-७२

# मागल्या दारांत माझ्या

मागल्या दारांत माझ्या नेहमी कोकीळ गातो :
ना कळे प्राणांत कां या बाण तो खोमून जातो !
गर्द झाडीआडुनी जो चालतो टाहो तयाचा
ढाळितो तो गंधवाहो होमणाऱ्या वाळियाचा.

ना क्षिती त्याला ऋतूची, धुंद तो फेकी स्वताला,
आधणींचें दूधसा अन् अमृतें जातो उताला;
तो असा गातां अवेळीं हात थांबे जेवतांना,
वाचनीं अन् काव्यपंक्ती वामकुक्षी सेवतांना.

शोधितांही आढळेना, टाळितो आभा-प्रसिद्धी,
आपल्या संथेंत एका खोदितो आतील सिद्धी;
या अकालीं तोच माझा सर्व झाडा मागणारा,
थांबतां वा पेंगतां अन् ऊर्जगुह्यें सांगणारा.

बोरी, ७-१०-७२

# उन्हांतले सरी !

उन्हांतले सरी ! बाई, उन्हांतले सरी !
खरेंच का माकडाचें लग्न तुझ्या घरीं ?
सोनियाच्या घरा तुझ्या मोतियांच्या जाळ्या
आत काय चाले तें न कळे कांही केल्या.
माकडाची टोपी कशी, माकडीची साडी ?
सोहळ्याला कोण कोण जमले वऱ्हाडी ?
कुणीं कुणीं केले किती अहेर केवढे ?
पाहुण्यांना वाटिले ते सांडगे की पेढे ?
आम्ही मात्र ऐकले ते पाखरांचे मंत्र
आणि पानीं वाजलेलें ताऱ्यांचें वाजंत्र.
ऐन वेळीं घातलें कां भुलाईचें पिसें ?
चार क्षणांतच लग्न आटोपलें कसें ?

बोरी, ८-९-७२

## चाहूल

मंद झालें ऊन, व्योमीं सात-रंगी साय-काला,
लांब गेलें पत्र भूचें थांबलेल्या पावसाला;
गूढ ये चाहूल त्याची तिष्ठत्या झाडा-पहाडा,
सागरी वाऱ्यांत वेढी साखरेचें स्वप्न माडा;
मातिच्या गंधांत न्हाती गारव्याची वेल आली,
सांडली प्राणांत ओली सोनचाफ्याची डहाळी;
डोंगळ्यांची रांग लागे, मांडकीचा खर्ज वाजे,
पावसावाचून न्हातें पावसीं हें चित्त माझें.

बोरी, १-६-७३

## गीत झालें बापुडें

हिंडतों माडांत हा मी सावळयांच्या संगमीं,
झावळीं आता नुरे जें गीत होतें नेहमी;
चालती शेतांत कामें तींच पूर्वीसारखीं,
मात्र कामेरीं जहालीं सूरताला पारखीं;

काजवासा देवळीं या आजही तेवे दिवा,
ना घुमे हाले परंतु घांटिच्या नादें हवा;
भिंगरीसा तान-घेणा आजही पक्षी उडे,
झापडें फेकून कोणी कान दे ना त्याकडे;

गोमुखीचा स्रोत येथे या तलावीं गाजतो,
थांबणारा नाहि कोणी ऐकण्याला आज तो;
आज जो तो सोय पाहे गीत झालें बापुडें,
मीच वेडा साथ देतों कोंडुनी प्राणीं रडें.

बोरी, १९-६-७३

# बघ इकडे बघ तिकडे

बघ इकडे बघ तिकडे
वन प्रसन्न हरित गार,
उदक स्वच्छ गाढ निळें :
किरण जाय आरपार.

होतीं नुक्तींच उन्हें :
दवकणांत द्युतिसुमनें,
सुटला मनमुक्तपणें
गवतांतुन गंधभार.

पण आता घन गरजे,
भूमि भिजे, रोह रुजे,
जडलें बघ खूळ विजे :
नाचे जणु तप्त तार.

घन हरुषे, घन वरुषे
तरि अजुनी भुइ तरसे,
तरुवर हे नववरसे,
म्हणशिल का जग असार?

घन होतां ऋतु-उदार
भू अपुली चिरकुवार,
होइं तशी एकवार
उदधीचें घेत ल्हार.

# रंग संध्याकाळचे

रंग संध्याकाळचे मीं हेरिले अन् चोरिले :
रात होतां दाट जीवीं ते न हातीं राहिले;
केतकीच्या गंधरानीं धावलों वाऱ्या धरूं :
भागतां अंगास साऱ्या लागला तो कातरूं;

कोवळ्या ओल्या स्वरांचा हार गुंफूं पाहिला :
आजही काटा तयाचा आत आहे राहिला;
अद्‌भुताचें फूल घ्याया सात सिंधू लंघिले :
तें दिशांच्या पार राहे, पाय झाले पांगळे;

जिंकिली यत्नें सखी अन् बाहुपाशीं ओढिली :
मी भुईला बांधलों, ती अंतरालें वेढिली;
ना मिळे कांहीच हाता, का म्हणूं ही व्यर्थता ?
जें मिळे अज्ञात थोडें त्यांत येथे सांगता.

बोरी, ११-७-७३

# माझ्या माथ्यावर

माझ्या माथ्यावर काजव्याचा दिवा,
पावसाने झाली मऊ मऊ हवा;
नीज न ये शेजे, कुरकुरे बाज,
कुणी तरी आत उतरितें साज;
लागेना चाहूल, वाजे ना पाऊल,
मनाचीच का ही सारी हूल, भूल?

बोरी, १२-७-७३

# सोस तू माझ्या जिवा रे

सोस तू माझ्या जिवा रे, सोसल्याचा सूर होतो,
सूर साधी ताल तेव्हा भार त्याचा दूर होतो.

दुःख देतो तोच दुःखी जाणतां हें सत्य मोठें,
कीव ये दाटून पोटीं दुःख तेणें होय थोटें.

या क्षमेने सोसलें त्या अंत नाही पार नाही,
त्यामुळे दाटे फळीं ती पोळणाऱ्या ग्रीष्मदाहीं.

त्या क्षमेचा पुत्र तू हें ठेव चित्तीं सर्वकाळीं,
शीग गाठी दाह तेव्हा वृष्टि होते पावसाळी.

त्या कृपेचे स्रोत पोटीं घेउनी आलास जन्मा,
साद त्यांना घालितां तू सूर तो येईल कामा.

पर्वरी, १४-७-७३

## फार दूर गेल्यामुळे

फार दूर गेल्यामुळे माझा चेहरा धूसर,
जिव्हाळ्याच्या गोत्रजांना पडे केव्हाचा विसर;
दुरावोत दुरावले—तूच मागेपुढे सखा :
म्हणेन त्यां माझ्या मुखीं आता तुलाच ओळखा.

तुझ्यामागे लागल्याने झाल्या कातडीच्या चिंध्या,
पाय बंबाळ रक्ताने, डोळां कोंदाटली संध्या;
तम वाढतोच आहे तरी बाहुल्याच तारा,
अंगीं खोदण्याचें बळ नवा पारावार सारा.

हा मी चालतोंच आहें—जरा थांबतांच थोडा
अकस्मात ओंजळींत आला उल्कापाती धोंडा :
कोसळत्या पावसीं या त्याचें व्हावें शेंडेफळ :
खातां सुकेजल्या पांथा यावें डोंगराचें बळ :
त्याने डोंगर होऊन असा चढावा डोंगर
आणि माझ्याचप्रमाणे व्हावें धूसर धूसर.

बोरी, १-१७-७३

## न्यूयॉर्कमधील चंद्रास

चंद्रा! तुला बघुन मीं दिन फार झाले,
मुद्रा उदास तव कां, मुखकांति वाळे ?
कां अंग चोरुनि असा फिरसी ढगांत ?
तूंही विषण्णमन का इथल्या जगांत ?

कैसें सख्या विसरसी स्मित आपुलालें ?
सारें रसत्व तव सांग कुठे पळालें ?
हृद्रोग घोर जडला कसला तुला हा
जो शोषितो तुजमधील रसप्रवाहा ?

चित्रालयीं, मधुगृहीं, रतिलास्यगानीं,
कासारतीरवनिं वा भरल्या दुकानीं
जातां तुला न वदलों सुखशब्द कांही
माझें तुझें म्हणुनि का चिरसख्य नाही ?

न्यूयॉर्कच्या गगनभेदक राउळांत
मी राहतों तरि सदा असतों बिळांत :
तेथून व्योम कुठलें ? सगळयाच भिंती !
भिंतींसवें चढत जाति अनंत खंती !

आधार डॉलर इथे—प्रभु तोच एक :
त्याच्यापुढे न गणितो कुणि बापलेक,
यंत्रास बद्ध सगळे, नच शांति कोणा,
जो तो झुरे उरिं, वरी करितो बहाणा.

सारीं सुखें रिचविलीं परि ना रिझालों,
कंटाळलों, तुजपरीच उदास झालों,
बैसे गळा, विसरलों स्वरसिद्ध वाणी,
दोघेहि आपण इथे भलत्या ठिकाणीं.

येथे विवंचक हवा बहुधा हिवाळीं,
होते उबाळ क्षणिं ती क्षणिं पावसाळीं,
आकाश दुर्मुख, ढगाळ, खतावलेलें,
होतें मनुष्यच स्वतःस दुरावलेलें.

येथे त्रिविक्रम असा पुरुषार्थ आहे,
साऱ्या जगांतिल सुवर्ण इथेच वाहे,
नाही परी भरिल जीव असा जिव्हाळा :
त्याच्याविणें सकळ वैभव बंदिशाळा.

उड्डाण घेउनि नभीं अवकाशयानें
हे भेटले जन तुला सृजनाभिमानें,
ते नेणती पण तुझें स्थळ काळजांत
जें दाटतें विनटतें तव चांदण्यांत.

येते दया अ-रस मूढ अशा मनांची
ज्यांना नसे रुचि अवीट सनातनाची,
रे, थांबलों जर इथे अधिकांश काल
माझा तुझा समज चार दिसीं निकाल.

आता गड्या चल घरास उद्याच जाऊं,
गोव्यांतल्या जनवनांत सुखें विसावूं,
हिंडूं कुळागर, तलाव, समुद्रवेला,
सारा प्रदेश तव राजरसीं भिजेला.

माडांतुनी फिरत मंदिरशिल्प ध्याऊं,
न्हाऊं जळीं, उठुनियां निज बिंब पाहूं,
तेथे निजत्व रससिद्ध पुनश्च लाहूं,
हर्षून वर्षुन मुदें सकलां सुखावूं.

गाईन मी स्मरसुखें तव चांदण्यांत,
दे साथ तूं मज सुखें स्वर साधण्यांत,
दोघेहि संथ उमलूं शत पाकळ्यांनी,
धुंदावुनी, मधुर आत्मरसीं भिजोनी.

रे, आपुला रस तिथेंच खरा दुणावे,
वृद्धी असो, क्षय असो, न रती उणावे,
तेथेंच बीज अपुल्या सगळया कळांचें,
सार्थक्य सर्व अभिजात तपःफलाचें.

न्यूयॉर्क, १७-१०-७३

# मुद्रा भद्राय राजते

आषाढी अमवास्येला देशाचे देखुनी तडे
साकडें पडलें तुम्हां हिंडतां गव्हरें-कडे;
पारणें फेडिलें तुम्ही झाडुनी आमुचें उणें,
'अहं'चा कापुनी रेडा भवानी न्हाणिली क्षणें;
लाभतां कौल खड्गाचा दर्शनीं देखिल्या विजा,
घेतले शक्तिचे ताळे, रेखिल्या बेरजा-वजा;
जोडिले कुणबी कष्टी होते जे पार मोडले,
आउतें आयुधें केलीं, तृणांनी दात तोडिले,
त्यांचेच वळुनी रज्जू तख्तांचे पिळिले कणे,
आसेतु वाजला डंका, साजलीं ध्वज-तोरणें;
गायींचा वाढला चारा, विप्रांच्या रुजल्या ऋचा,
विक्रमाप्रति एकाच्या अंबेच्या फुटल्या भुजा;
ओसाडीं थाटिलें नेटें आनंदवनभूवन,
बोललां, "श्रेय सर्वांचें, श्रीचें राज्य सनातन."
भूषणें गायिला गाथा, गागा संतोष पावले,
समर्थें पाहिलें स्वप्न लोकीं साक्षात जाहलें;
पुण्यश्लोक असा राजा न युगीं श्रुति गाजते,
लोक-सिंहासनीं तेणें मुद्रा भद्राय राजते;
संतत्वें धरितां खड्ग भू सुये स्वर्ग देखणा,
दीक्षेने तुमच्या येथे असा योग कधी पुन्हा?

बोरी, २-५-७४

# उन्हासारखें सुखहि सांडतें

उन्हासारखें सुखहि सांडतें तरि न तयाचें भान कुणा :
स्वतांत पडला मिटून त्याला स्वर्ग दिला तरि तोहि उणा;
सीमिततेचें कवच मिळे जें करावया शैशव-जोपा
पंख उगवतां तेंच काचतें पाश जसे बळत्या रोपा;
उड्डाणाची उबळे ऊर्मी तरि न तयाची मिठी सुटे :
चोच मारिल्याविना न आतुन कवच न बाहेरून फुटे;
जननीसम जी देइ उबारा ती नियती तव वाट बघे,
तुझ्या इशाऱ्यासवें तियेच्या सजग कृपेला कोंभ निघे;
नको घाबरूं, पंख आवरूं, अनावरा आकाश खुलें :
पल्याड आहे प्रकाश तिष्ठत ओंजळींत घेऊन फुलें;
फाकण्याहुनी सुख न निराळें, पंखच रे यशभाग्य तुझें,
साकळला जो स्वतांत त्याचें जिणें, विणें सगळेंच खुजें.

पर्वरी, १२-६-७४

# सर ओसरली जरा

सर ओसरली जरा, ऊन शिंपडलें थोडें,
चमकले गारांपरी शुभ्र प्राजक्ताचे सडे.

इटुकल्या पाखराने निळी घेतली गोलांटी,
फूल लांबट पिवळें झालें सोन्याची वेलांटी.

आलें भिंगरी होऊन एक पोपटी पिसोळें,
त्याला पाहून हासलें ऊन पानांतलें ओलें.

ओढा झुळूझुळू वाहे, पाणी पारदर्शी काच,
दिठी जाई तिथे दाट नाना कत्रणीची पाच.

आकाशाने धरेवर छत्री धरली पाऱ्याची,
कुठे गर्द पालवींत शीळ घोळते वाऱ्याची.

आज फारां दिवसांनी कोंभ मुसळाला आले,
माझ्या परागंदा जीवा पुन्हा माहेर मिळालें.

बोरी, १३-७-७४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२७३९
२३७०५
काव्य ३१५८
संद. शाखा (स्थळ प्रत)

## पिशी ?

झाडावर फुलें
जशीं कडेवर मुलें
तीं मी कशीं खुडूं ?
मला उगाच ये रडूं !

वासरूं ये लुचूं
त्याला मागे कशी खेचूं ?
हंबरते शितू
दूध जाईल ना उतूं !

झुबक्याची खार
नाचे, उडे घरभर,
दादा जातां धरूं
माझा ऊर पाहे भरूं !

पाकोळ्या उडती
पोरें त्यांना कुस्करती,
रडवेली अशी
का ग खरीच मी पिशी ?

बोरी, २१-८-७४

## सांज होतां

कोंबड्याच्या आरवाने पहाट उघडे,
श्रावणाच्या फुंकराने पारिजात झडे.
कत्रणीच्या पत्रीमध्ये पाखरांची जत्रा,
वाती सावरीत येती फुलजाती सत्रा.
सोनवर्खी उन्हामध्ये चांदवर्खी सरी,
वेलीवेलींतून रास खेळतात परी.
गर्द चोहींकडे चारा, दूध झालें धानीं,
कावळ्याच्या डोळ्यापरी जिथे तिथे पाणी.
टाकळ्यांच्या दाटीमधे पाकोळ्यांचे थवे,
सांज होतां लागतील काजव्यांचे दिवे.

बोरी, २१-८-७४

## ज्ञानियाला सोपानाचा

ज्ञानियाला सोपानाचा तसा तुझा मला ळळा,
तुझ्या गळ्यामुळे राजा माझा ओथंबला मळा;
तुझी स्वारी येतां घरीं वाजतात चाळ, वाळे,
बाळगोपाळां सुचती गोड शब्दांचेच चाळे;
तुझ्या रसनेच्या चोजा वहिनीच्या 'वाटाघाटी',
'अतोनात' नातवंडें झोंबतात सहीसाठी;
तुझ्या खोड्या, तुझ्या कोड्या, तुझे किस्से, तुझें गाणें,
वेड पांघरून, जनां घाली शहाणे उखाणे;
जगीं दुःख झालें फार, लोक विसरले हसूं,
लाव पान, ऊठ गड्या, पुन्हा मैफलीला बसूं;
परवाच मुक्तामाता गेली बहिणाये भेटी,
सुखें सारून करिती दोघी तुझ्यामाझ्या गोष्टी;
त्यांच्याकडे तुला मला अंतीं जावयाचें आहे,
नको पण इतुक्यांत, खूप गावयाचें आहे.

बोरी, २३-८-७४

## याच निळ्या डोहाकाठीं

याच निळ्या डोहाकाठीं माझी राहील राहुटी,
तुझी हाक येतां सख्या निघेन मी उठाउठी.
काडी काडी जोडिलें जें सर्व काढिलें लिलावीं,
ठेव मुद्दलासकट गुंतविली तुझ्या नावीं.
आता धाडिसी तो दीस झाला आहे कळांतर,
मोडितों तें, न्याहळीत तुझें बिंबलें अंबर.
कधी प्राजक्त-पहाट, कधी सकाळ सोन्याची,
कधी पाऱ्याची दुपार, कधी सांज निखाऱ्यांची.
वाघ-चपक्याचे ढग जाती बिंबवोनी जग,
दहा योजनांच्या दाहें वाढविती तगमग.
जाणतों मी येथे उणा, चार दिसांचा पाहुणा,
क्रूर खेळांतही तुझ्या गूढ कणवेच्या खुणा!
भाळीं नक्षत्रांची जाळी अशी रात्र येते डोहीं,
चांद-मासोळ्या चाळीत म्हणे गुंतूं नको मोहीं.
पण सुटतां सुटेना तुझ्या लाघवाचा मोह:
गड्या सोंगाड्या इथे का तूंच जाहलासि डोह?

बोरी, ३०-८-७४

# मी इथे निःसंग संगीं

मी इथे निःसंग संगीं आणि रंगीं एकला,
या जगाच्या बंधपाशीं मेघसा मी मोकळा.

हिंडतों केव्हा वनें, वाळूंत केव्हा लोळतों,
पाखरांचा हेल केव्हा झेलुनी मी घोळतों.

लोभलों केव्हा न भोगां वा न त्यां भ्यालों कधीं,
टोचलेलें दुःख त्यांनी, गाळुनी प्यालों मधीं.

त्राण जें तेणेंच आलें ढाल त्याची जाहली,
धार वारांची हजारों अमृताने नाहली.

मानिनी डंखून जातां पंखमर्मी पेटलों,
देव जेथे मोटके तेथे यमाला भेटलों.

गाठलेलीं शैलशृंगें लोटिलीं लाथेसवें,
लाडकीं आता मला हीं पायथ्याचीं आसवें.

खेळतों केव्हा मुलांशी वा फुलांशी बोलतों,
तीं न संगें तेधवां फांद्यांसवें मी डोलतों.

पर्वरी, ३१-८-७४

## जातां जातां

जातां जातां उन्हें जिण्याचीं आता मावळतांना
आठवणींच्या पाषाणांना फुटे फुलांचा पान्हा;
मिठींत रिघती काटे तेव्हा दिठीस फुटती फाटे,
वाटेवरती अडतों तेव्हा भिडती प्राण पहाटे.

थकतां पाउल दिसे अचानक नव गवताचें पातें
गंध ढाळितें उरांत त्याचें लाख जन्मिचें नातें;
सरणाच्या राखेंत देखतां किरणांची रांगोळी,
जगांत जळतां होळी बघतों आकाशांत दिवाळी.

विसावतां मी, दुरावलेले ओतित येती मोती :
शेजेवरती उजेड पाडित जमती होउन ज्योती;
दुःख भोगिलें तें मज सारें वाटे खोटें आता :
उमज एवढी नसे थोडकी जातां गातां गातां.

बोरी, २६-१०-७४

# सुख जालें

सुख जालें, सुख जालें : कास्यांतुनि सुम आलें,
स्वर्गीतिल जलसेकीं मन न्हालें, मन न्हालें.

वन आता वासंतिक नवकिसलय-बहराचें,
स्वर्णारुण किरणांतिल द्विजकूजन-प्रहराचें.

उसवति हृदयांत झरे, उसळति उदकांत हिरे,
सजल उन्हीं, अमल घनीं वर्णोपम ध्वनि गहिरे.

स्तन्याचा गंध तृणीं, आज पुरे सर्व धणी,
दृष्टींतुनि प्राण-भेट, परकें नुरलेंच कुणी.

आला क्षण सण झाला, जग धालें, जग धालें,
कास्यांसहि सुख जालें, सुम आलें, सुम आलें.

बोरी, २९-१०-७४

## जीवघेणा श्वास

जीवघेणा श्वास आता लागला,
राहिला ना आगला वा मागला;

वाट वाढे, दीस वेगें आटतो,
आंवढा कंठीं खिचेसा वाटतो.

चालतां पायांत थंडी गोठते,
पाहतां डोळ्यांत साई साठते;

गेह देहाचें इथे मातीमधे!
कां न साधे सत्य हें साधेंसुधें?

नाग टाकी कातडी येतां जरा
वंचिली कां शक्तियुक्ती ही नरा?

पांगळ्या खिंडींत या कोंडूं नको,
साद दे रे, शेवटी सांडूं नको.

बोरी, ६-१२-७४

## वास नाही ज्या फुलांना

वास नाही ज्या फुलांना फक्त तीं पाहून घे,
धुंद आहे गंध ज्यांना तो तिथे जाऊन घे.

चांदणें लाटांत जेथे, साउल्या वाळूमधे,
रात्र संपेतो इमानें गीत तूं गाऊन घे.

प्रीत जेव्हा जागणारी सर्वभावें बाहते
बाहुंचा वेढा तिचा तू साहसें साहून घे.

वाढत्या ग्रीष्मांत जेव्हा मेघ माथीं कोसळे
सारुनी संकोच सारा त्यांत तू न्हाऊन घे.

नेम ना लागेल केव्हा तुष्टतेची वाळवी :
वाळण्या ती या जगाचें दुःख तू लावून घे.

वाटतां सारेंच खोटें, प्रेमनिष्ठा आटतां,
एकटा अंतर्गृहींच्या ज्योतिने दाहून घे.

सांत इनेज, २०-५-७५

# मी कशाला गीत गाऊं ?

मी कशाला गीत गाऊं ? कोण आहे ऐकणारा ?
मी कशाला दीप लावूं ? कोण आहे जागणारा ?

मी कशाला गस्त घालूं रात्रिचे हेरीत धोके ?
धावणारा कोण आहे ऐकुनी माझा इशारा ?

आंबलीं सारींच वल्हीं, थांबल्या साऱ्याच होड्या,
आंधळीं सारीं सुकाणीं, दाखवूं कोणास तारा ?

जाणतों मी तोच साथी खंत माझी पेलणारा,
गीत हें त्याच्याचसाठी, दीप हा अन् हा पहारा.

बोरी, ३०-५-७५

# आश्वासन

घोर काळोखांतही देतात रे सांगात तारे,
मातलेल्या सागरांही बांधिती अंतीं किनारे.

वाळल्या काष्ठांतही रे विस्तवाचें स्वप्न जागे,
पेट घेतां तेंच फेकी रुद्रनेत्रींचे निखारे.

राक्षसी संक्रांत येतां अर्भकांना ग्रासणारी
मध्यरात्रीं वीज देते कृष्णजन्माचे इशारे.

खंत कां रे व्यर्थ प्राणा ? कोठली ज्वालेस कारा ?
रोधिती वेगा तिच्या का शस्त्रसज्जांचे पहारे ?

बोरी, ७५

# तोंवर

विहग उडाला नाही तोंवर परिस निरागस गाणें,
वसंत वनवन फिरतो तोंवर निरख नवागत पानें;
ऊन उगवतें कळ्यांत तोंवर कर अनुनय रे त्यांचा,
जळीं चांदणें डुंबे तोंवर शमव अनल हृदयाचा;
स्मित जिवणीवर उमले तोंवर नातें जडव जगाचें,
डोळे होती ओले तोंवर आसू पूस दुज्याचे;
त्राण असे तों प्राण आपुला पेर तृणीं-पाषाणीं,
तारुण्याचा बहर असे तों स्थिर हो मूळ ठिकाणीं;
जाग असे तों साद तेथला आकळ पंचप्राणें,
गळा फिरे तों सर्व कळांनी आळव अपुलें गाणें.

१९७५

## ओघळती रंग जळीं

ओघळती रंग जळीं, मावळती वेळा,
तरल हवेवर झुलतो मंद गंध-शेला;
गगनिं फुलवि मेघ-मोर पांढरा पिसारा,
मोत्यांची लाट फुटे, ढासळे किनारा.

वर-खाली दीप्तीच्या आदळती लाटा,
परतीचे खग बुजले, विस्मरले वाटा;
माड-झाड धूसर जणु चित्र चिनी भासे,
जवळ कुणी नसुन गमे पोळुनी उसासे.

न कळे कां उगिच जमे लोचनांत पाणी!
कोण अशी जननांतर गातसे विराणी?

१९७५

तुझ्या रानांत रे, फुलापानांत रे,
खस्याळ खुस्खूस हसूं,
पाण्यांत कोवळी चावट चावळी,
कशी रे जवळी बसूं!

तुझ्या रानांत रे, नुरें भानांत मी,
वाऱ्याने घुंघट ढळे,
सापाची चाहूल लागून पाऊल
मुडून पैंजण गळे.

तुझ्या रानांत रे, माझ्या प्राणांत रे,
व्याकुळ वाजतो वेणू,
वामाने ओली चुनडी चोळी,
कोठून बळ मी आणूं?

तुझ्या रानांत रे, माझ्या थानांत रे,
आतून मातती ऋतू,
माया ही आवर, काया ही सावर,
घागर जाते रे उतूं!

१९७१

# पाऊस श्रावणी

पाऊस श्रावणी हासला बाई
लेऊन जर्तारी साज,
आपण होऊन साजण तसा
अंगणीं आला गे आज.

आपाद भिजलें, आपाद लाजलें,
वाजलें सुरूचें रान,
पुढल्या लाटांत, मागल्या वाटांत
रंगांस आलें उधाण.

वाळूंत बैसल्या ठायींच गेलें
लंघून साग सात,
दुपार असून सर्वांगीं भोगिली
माघींची चांदणी रात.

नुरलें अंगण, नुरला साजण,
नुरलें मीहि स्वतांत,
कापूर तेवढा तेवत होता
निवांत निळ्या जळांत.

१९७५

# माघी चांदणें ये दारीं

ज्वाळा वैशाखी संपून माघी चांदणें ये दारीं
पण मोर गेले राना, झाल्या वईपार खारी !
आता चांदण्याची थंडी आणी पडसें खोकला,
संगीं असून तुझ्या ग, जीव एकला एकला.

जळे केव्हाच मोहर, गळूं लागलींत पानें,
ओढ रहावी जनाला कशी पूर्वीच्याप्रमाणे ?
बोल लावावा कुणाला ? जड ज्याचा त्याला भारा,
हक्याटक्या देतां गाठ दीस आटोपतो सारा.

त्यांना तसा तुला-मला नुरे फुलांचा आठव :
उरे घावाचीच माव असा मानवी स्वभाव;
जरा, व्याधी येतां घरीं थोडें आकाश बघावें,
सलोख्याचें बोलावणें येतां संतोषें निघावें.

आहों तोवर येथलें घेऊं टपालाचें सुख,
जरी काजवा पेटला तरी उजळे काळोख.

मडगाव, २६-९-७५

मी तुजसाठी
या नदिकाठीं वाट पाहतें जन्माची,
न दिसे होडी
तरि मज गोडी जळीं बिंबल्या रंगांची.

येथे तरुवर,
तेथे गिरिवर, शिरीं भिरीं ही भिरभिरती,
येथे मोहर,
तिथे मनोहर घन कनकाचे भुरभुरती.

न कळे कोठुन
येते दाटुन स्वरमधुमादन शीळ निळी,
चढते भोवळ,
झरतें मोहळ, उरिं उठते कळ सोनसळी.

कळेंतलें सुख
तुझेंच श्रीमुख, मन माझें नदि ओलांडी,
अता कशास्तव
वाट बघूं तव ? मीच नाव, तूं नावाडी !

बोरी, २९-९-७७

## शैशविंचा व्रण तसाच वाहे

शैशविंचा व्रण तसाच वाहे
रुधिराने जग न्हातें आहे
मानव शास्त्रें पढे तेवढा
अधिकच दानव होऊं पाहे

बाळपणींचे सगे-सवंगडी
फूलपाखरें धरीत होते
कुस्करलेले पंख तयांचे
काळिज माझें चिरीत होते

ख्रिस्तासाठी ख्रिस्ती पोरें
सरड्यांना ठेचीत वेचुनी
कण्हणें त्यांचें ठणकत होतें
हृदयीं माझ्या रडें होउनी

वडील आणित ढीग मासळी
सतेज ताजी थडथडणारी
झपझप आई कापित असतां
लागत होती धार जिव्हारीं

शिकार कोणी टिपतां गावीं
घरीं यायची तंगडी डावी
घमघमतां छत्तीस मसाले
कशी न जिव्हे लाळ सुटावी !

त्या लाळेने पशुसम मीही
चाटित माझी जखम बुजविली !
तिनेच भिजवुन अन्यायाची
उरलीसुरली चीड विझविली !

अजातशत्रू सहस्रबाहू
कुणी छाटितां वृक्ष दयाघन
चुटपुटलों क्षण; तरि न राहिलें
तें पूर्वीचें द्रवणारें मन

दारावरुनी वधशाळेला
मुकाट जातां गुरें-मेंढरें
वळवुनि डोळे पढायचा मी
पुस्तकांतलीं रितीं अक्षरें

पुढे महाकाव्यांत वाचिल्या
चांद्र, सौर वंशांच्या गोष्टी
म्हणे कोट्यवधि लढले, मेले
इह किंवा पर जितण्यासाठी

प्रतिभा जेव्हा देउनि जाते
शौर्याचा क्रौर्यास मुलामा
युद्धकथा वेधिती रिझविती
विशेषतः निःशस्त्र गुलामां

दोन महायुद्धांत जागतिक
त्याहि चाखिल्या चवीचवीने
देउनिया वेळींच इशारा
आवरिलें ना कुण्या कवीने !

स्वातंत्र्यें लंघिला उंबरा
घरच दुभंगुन आम्ही लढलों
परस्परांच्या न्हालों रुधिरीं
तोंड झाकुनी तरी न रडलों !

असुरपणें आम्हीच फेडिलें
मातुःश्रीचें लुगडें, चोळी
पिता देवसा तारूं बघतां
त्यास घातली निर्घृण गोळी

सत्तेस्तव नेत्यास वधावें
असा जगाचा नवा शिरस्ता
पुरता त्याचा वंश खणावा
हा पुढचा प्रगतीचा रस्ता

या रस्त्याने चढतिल तख्तें
त्यांच्या माथीं छत्र-तोरणें
शिष्टासन त्यां द्यावें सत्वर
हींच राजनीतिज्ञ धोरणें

प्रलयंकर हें खरें, त्यांत परि
तुझा नि माझा वाटा आहे
अनुतापाने उडून खपली
शैशविंचा व्रण तसाच वाहे

बोरी, ७-९-७५

## कवडसा

नाही भरवसा माझा चांद-कवडसा केव्हा जाईल उडून
नाही भरवसा माझा पाऱ्याचा आरसा केव्हा जाईल झडून
आहें तों मी उभी जीव खिळवून नभीं झेप घे रे माझ्या राघू
आरक्त विराण्या निळ्या प्रीतीच्या कहाण्या तुला आसुसलें सांगूं
चोख आहें तोंच मार प्राणांतिक चोच तडा जाऊं दे आरशा
उसवल्या क्षणीं तुझ्या आनील पंखांनी हर्षे फुटो कवडशा
तडकल्या स्थानीं कुणी वेडी मैनाराणी तुझ्या पारखून खुणा
झुरून म्हणेल केव्हा उरांत भेटेल निळा अदृष्ट पाहुणा !

बोरी, १०-७-७६

# ती म्हातारी

ती म्हातारी
कधिहि यायची
भातुकलींतिल ठकीसारखी
बुटकी रेखिव,
घेउनि कधि शेणाचा गोळा,
केळफूल वा सुभग कोवळें.

वर्णायाची
हिच्या हातच्या सैंपाकाची,
अळवाच्याही
भाजीची चव,
दिसेल तेव्हा हसावयाची
तळ्यांतल्या साळकासारखी,
रडायची कधि
सुनवासाच्या कथा सांगतां
डोळ्यांमधुनी सांडित टपटप
पहाटचें पहिलें सुंदर दव.

निघतांना पण
त्याच सुनेच्या मुलांस द्याया
घरुन न्यायची
पापड, कैरी, सुकी मासळी,
जुनें आंगडें
ठेवुनि आठव.

फुंकायाची
सांदीमधली चूल निराळी,
पावसांत साळींत राबतां
जळांतली न्हायची मासळी.

घरीं आमुच्या
येतांना पण
क्षय जडल्यागत धापायाची,
बसल्यावरती खोकायाची
ओठांवरती धरून पालव,
मागायाची
सणासुदीला
आणा-चवली पसरुनि सोगा,
जातां घरिं परि
कवाड लावुनि
भरायची भिंतींतिल मोगा.

एक दिवस ही मला म्हणाली :
"कळलें का म्हातारी अपुली
आज पहाटे पटकन गेली ?
म्हणे पाहिलें
मोग्याजागीं तिने बोळकें
आणि वासिला आ कायमचा.
चोर नव्हे कुणि दुसरातिसरा :
पहिला नातू तिचा लाडका."
मीं हिज म्हटलें :
"कालच ती रस्त्यांत भेटली,
संध्येसम किति गोड हासली!

मला म्हणाली,
द्याल काय धनि धुमटी पाना,
चवली वा एखादा आणा ?
कृपा प्रभूची,
खिशांत होती एक पावली!"

चोरी, १३-७-७६

# ओढाच आहे आटला

ओढाच आहे आटला, आणूं फवारे कोठले ?
केव्हा जळें बासे कळे गंधें मरंदें दाटले ?

होतीस ती नाहीस तू, मीही न तेव्हाचा तसा,
थंडा ऋतू ग्रासी असा झाडाप्रमाणे माणसा.

तेव्हा रहावें त्यापरी गाळीत पानें वाळलीं,
काष्ठांतही वन्ही वसे : श्रद्धा जपावी आपुली.

त्याऐवजी शृंगारितों खोट्या स्मितांचे बाहणे,
वन्ही फुलीं हासेल का ज्वालांतुनी गेल्याविणें ?

बोरी, १४-७-७६

# कावळ्याची तक्रार

चतुर बोलका कुणी कावळा
दिवसभऱ्याची करून वणवण
येउन बसला घरट्यापाशी
मधुर स्मृतींचें करीत चर्वण.

बाइल त्याची लेकुरवाळी
पिलांस होती भरवित पोळी,
लक्ष तिचें नव्हतें नवऱ्यावर,
सांजहि होती काळी ओली.

कुर्‍यांतच बोलला तिला तो :
“आलों कधिचा तुला न पत्ता,
जाइन तेथे जरी महत्ता,
घरीं अशी ही नित्य तुच्छता !
स्त्रिया रोज किती गौर-गोमट्या
जर्द घातल्या गोठपाटल्या
बोलाविति मज दोहीं बाहीं
भरलेल्या पंक्तींत आपुल्या.
क्षणहि परी मी मुळी न चळतां
धापत येतों तुझियासाठी,
काठी काठी जमवुनि करितों
संसाराच्या आटाआटी.”

हसून खुदकन म्हणे कावळी :
" म्हणुनच ना मी तुमच्यासाठी
भरवित असतें मुलांस तुमच्या
घरींच थांबुन उपासपोटीं ?"

पणजी, ५-८-७६

# मूकस्तंभ राणी !

आल्या टपोरून जाई, ओढा निळें गीत गाई,
चित्रपंखी पिसोळ्यांना तुंबा चुंबायाची घाई.
तृप्त लावण्याचा ऋतू जातो पानींफुलीं उतूं,
पाखरांच्या वेलांट्यांनी केला अधांतरीं सेतू.
भुकेल्यांची कामधेनू धरा लागे दाणे गुणूं,
विणूं पाहतो श्रीरंग आकाशांत इंद्रधनू.
माझ्या मूकस्तंभ राणी ! कां गे डोळां असें पाणी ?
पहा प्राजक्तीं नहात आला श्रावण अंगणीं.

बोरी, ११-८-७७

. १ .

भिरभिरणारीं फुलपाखरें
कधी कुणीं एकत्र गुंफलीं आहेत काय ?
पण क्वचित केव्हातरी
एकाएकी तीं कवितेंत गुंफलीं जातात
आणि त्यांच्या लवलवत्या भिऱ्यांत
लावण्याचा श्रावण मूर्तिमंत होतो.

. २ .

परवाच एका देवमाणसाच्या
अंत्यदर्शनाला गेलों होतों.
त्याच्या शवावर फाटक्या चिंध्याच होत्या,
पण त्यांच्या शालीन दीप्तींत
सारे लौकिक दिमाख हतप्रभ झाले होते.
वाटलें, माणसाला अजून अभयाचा आशीर्वाद आहे.

. ३ .

उद्विग्न अवस्थेंत
जेव्हा मी ज्ञानेश्वरी
किंवा तुकारामाचा गाथा उघडतों
तेव्हा एकदम एखादी ओळ
उदंड आश्वासन देऊन जाते.
आणि तरीहि म्हणे
तीहि कविता
आणि मी लिहितों
तीहि कविताच !

. ४ .

मला कुणीं तरी विचारलें,
नवी भाषा कशी शिकावी ?
मीं म्हटलें,
त्या भाषेतील पोरीच्या प्रेमांत पडावें
आणि तिच्या समवेत
तिच्या भाषेतील प्रेमकवितांचा आस्वाद घ्यावा.
लोक हसले.
खरीच का ही हसण्यावारी न्यायची गोष्ट ?

. ५ .

खिडकी असावी नेहमी उघडी :
सकाळ, संध्याकाळ, रात्रीं, मध्यरात्रींदेखील
सूर्यचंद्रांचे उदयास्त पहाण्यासाठी,
नक्षत्रखचित आकाशांत टक लावण्यासाठी,
रस्त्यांतल्या तोडलेल्या झाडाचा
पहिला धुमारा हेरण्यासाठीदेखील.

. ६ .

जीवन क्षणभंगुर आहे
आणि कटुहि आहे
असें सगळेच सांगत आले.
पण त्याचा प्रत्येक क्षण
अडुळशाच्या फुलासारखा
देठांत मधाने भरलेला असतो
हें मी चाखूनचोखून तुम्हांला सांगतों आहें.

.७.

जेव्हा गच्च झाडांचे पुंजके
रात्रीच्या खिण्ण काळोखांत
अस्वलांचे हिंड होऊन
गोठणीला बसतात,
नखाळ आंधळ्या आठवणी
वाघळें होऊन
जिवाला घसटून जातात,
खाडीच्या पाण्यांत सोडलेले पाय
शवाचे तर नसतील
असा मासोळ्या
आपल्या करवती ओठांनी
हव घेतात,
आणि त्यासरशी पाण्याची थंडक
मृत्यूची नखी होऊन
छप्पन्न नाड्या छेडूं लागते,
तेव्हा दूर डोंगरीं लागलेल्या दिव्यावर
मी टक लावतों
—तेवढ्यानेहि मिळून जातो
केवढा धीर!

बोरी, १३-८-७६

# दिसली नसतीस तर

रतनअबोलीची वेणी माळलेली
आणि निळ्या-जांभळ्या वस्त्रालंकारांत
संध्येसारखी बहरलेली तूं
तळ्याकाठच्या केवड्याच्या बनांत
आपल्याशीच हसताना मला दिसली नसतीस
तर आज माझ्या जीवनाच्या अस्ताचलावर
हा भुलावणा सतरंगी सोहळा
असा सर्वांगांनी फुलारलाच नसता.

आपल्याच नादांत तूं
पाठ फिरवून परत जातांना
तुझीं पैंजणपावलें जीवघेण्या लयींत
तशीं पडत राहिलीं नसतीं
तर माझ्या आनंदविभोर शब्दांतून
कातरवेळची कातरता
आज अशी झिणझिणत राहिलीच नसती.

अबोलकेपणाच्या गूढ गाढाईने
जाईजुईच्या सांद्र-मंद सुगंधाचा लळा
सहज चुकार स्पर्शाने तू मला लावला नसतास
तर उमलत्या फुलपाखरांची
आणि मुक्याभाबड्या जनावरांची
आर्जवी हळुवार भाषा
इतक्या स्पष्टपणाने मला कळलीच नसती.

तू कशामुळे माझी जिवलग झालीस
तें खरेंच मला आता आठवत नाही;
पण मला तोडतांना
समुद्रकाठच्या सुरूंच्या बनांत
मिट्ट काळोखांतून चंद्रकोर उगवेपर्यंत
तू मुसमुसत राहिलीस
हें मात्र अजून मी विसरूं शकलेलों नाही.
त्या वेळचीं तुझीं तीं आसवें
अजून माझ्या कंठाशीं तुडुंबलेलीं आहेत.
तू तेव्हा तशी मुसमुसली नसतीस
तर माझ्या शृंगाराचा अशोक
आज करुणेच्या आरक्त फुलांनी
असा डवरलाच नसता.

तू तेव्हा आकाशाएवढी विशाल
आणि अवसेच्या गर्भासारखी दारुण
निराशा मला देऊन गेली नसतीस
तर स्वतःच्याच जीवन-शोकांतिकेचा
मनमुराद रस चाखून
निःसंग अवधूतासारखा
मी या मध्यरात्रीच्या चांदण्यांत
असा हिंडत राहिलोंच नसतों.

तूं केवळ माझी प्रेयसी नव्हतीस:
माझी सशरीर नियति होतीस.
तसें नसतें तर आज जो काय मी झालों आहें
तो झालोंच नसतों.

बोरी, १४-८-७६

## घन वरसे रे

घन वरसे रे, घन वरसे रे !
वरसे जळसर आले सरसर मल्हाराचे स्वरसे रे !

भरुनी आले नदि-नद-नाले,
जरठ तरुहि जाहले रसाले,
द्रुमपल्लवही न्हाले धाले जणु मोराचे परसे रे !

कातळ, डोंगर हिरवळ ल्याले,
रूढ नागांचे शमुनि निमाले,
मुंग्यांनाही पंख निघाले, वन नंदनसे हरसे रे !

मनुजांतिल परि दाह निवेना,
मृद्‌गंधेंही हृदय उलेना,
मुख उजळेना, स्नेह फुलेना म्हणुनि सुखिंहि मन तरसे रे !

बोरी, १७-८-७६

सावळ्या विठ्ठला तुझें सावळेंच अंग
सांग कसें गाजे जगीं नाम पांडुरंग ?

तुलाच रे नाही कशी लोकीं जातपात ?
शिंप्या नाम्याहातचा तूं खासी दूधभात,

काढिसी बंक्याचा काटा हातें हळुवार,
दाम्यासाठी नेसी हुंडी होउनी महार.

धर्मभ्रष्ट कसा तुझा सारा व्यवहार ?
कबिराच्या शेल्यामधे होसी जरतार.

विठ्ठला विठ्ठला तूं रे सर्वांगीं ओवळा,
तरी कसा कर्मठा तूं अभ्यंग सोवळा ?

बायकांत पुरुष तूं लांबोडा लांबोडा !
नामयाच्या जनीचाहि घालिसी आंबाडा.

वाखाणितो रूप तुका 'सुंदर तें ध्यान',
परी देसी कुब्जेलाही दृढ आलिंगन.

आईपरी पान्हा तुला फुटे लवलाहीं
म्हणून का तुला बापा म्हणती विठाई ?

बोरी, १७-८-७६

# गंगेंत मी काल सचैल न्हालों

गंगेंत मी काल सचैल न्हालों
माझ्या मनाच्याच तळा-मुळाशी,
श्रीपद्मसा गंधसगर्भ आलों
माझ्याच प्रज्ञा-प्रभव-प्रकाशीं.

अस्थी जळीं आर्य दिवंगतांच्या
स्पर्शीं कथा सर्व कथून गेल्या,
त्या आज माझ्या कमळाक्ष-डोळां
तीर्थोदकें तृप्त सतेज ओल्या.

मी पाहतों श्रेणि हिमालयाच्या
सूर्याचिया स्वर्णरसांत न्हाल्या,
हंसावळी सर्व गतायुषांच्या
संकोच सोडून समोर आल्या.

गेल्या युगांच्याच मुळ्या पुन्हा या
होती इथे फुल्ल भविष्यवेली,
त्यांच्याकडे लोकित ऐकतों मी
भृंगांचिया छंदविभोर केली.

माझ्यांत मी मग्न असून ऐसा
माझ्या दिठीपार त्रिलोक नाही,
आता जरी पाश नुरे कशाचा
स्त्रष्ट्यापरी नाहि मलाहि घाई.

बोरी, १८-८-७६

## अर्घ्य

वणव्यानंतरच्या विपिनापरि विपन्न जेथेतिथे मनें,
फुलतें फूलहि कीड लागुनी गळे धुळींत विषण्णपणें.

मुलें स्मितांविण, खग गीतांविण, नभ पंखांविण हिरमुसलें,
बघत वाट सार्थीची टपती तरुशिखरांवर गृध्रकुळें.

आशा तितुकी चिवट एकटी परि तिज न कुठे पात फुटे,
भकास डोळे जिकडेतिकडे, पुरतें त्यांतिल स्वप्न मिटे.

पवन वाहतो तोहि दाहतो, जळिंहि न चिमणी चोच भिजे,
तरुणींच्या गर्भातिल स्पंदहि अर्ध्या वाटेवरति थिजे.

आग लावुनी जिवास जागा जो कुणि असल्या ऋतुंत जळे,
पडोत त्याच्या पदकमळांवर दहिवरसीं मम अश्रुजळें.

बोरी, १८-८-७६

ज्यास्तव मीं पाखडिला प्राण ऐन तरुणपणीं
मिळलें तें, पण त्याची राख करीं वृद्धपणीं.
अयशांतहि लढले जे तेच भाग्यवंत खरे,
सुयशांतहि मी भणंग, विद्ध विषल नियति-शरें.

तडफडतों मी मनांत, कर चोळित हळहळतों,
विक्रम दडवून आज वंचकसा तळमळतों.
प्राणच समरा न पुरे, चिरतत्पर तनुहि हवी,
मी म्हणतों, ही पडून कधि मिळेल तरुण नवी?

कविपणांत रविहृदया झटक्यांतच मी भिडलों,
होरपळुनि पडलों तरि चवड्यांवरि सावरलों.
संपातीसम आता दृष्टींतच वेग उरे,
थकलों तरि उदयाचलिं टक माझें एकसरें.

बोरी, १८-८-७६

## खंत

एकच मज खंत : आज मातले जगीं महंत,
सुजन-साव गुंडग्रस्त, त्यांच्यातहि क्वचित संत
असला जरि एखादा तोच शीघ्र जाइ सुळीं.
जनकौलें, धनकौलें पिळणारे अतुळ बळी
त्यांस न कांहीच उणें, सुखलौकिक दामदुणे,
पदचाटू करिति चुरस पंडितही बनुनि सुणे,
मटकाविति फुकटांतच सतिचेंही धवल शील,
नीतीचे गस्तखोर भीतीने धरिति बीळ.

अवकाळी कवटाळी सरले अजुनी न दीस,
शतकें हीं खिस्तशका व्यर्थ होत येति वीस.

बोरी-पणजी प्रवास, १९-८-७६

# एक सांध्यचित्र

दूरांतून डोळा मिचकावी दिवा,
हिरव्या माळांत घोटाळे गारवा,
शेवटचा थवा चालला कोटरा,
दिशांत काळिमा पसरी पिसारा.

खुंटावर कोणी एकाकी पाखरूं
कातर स्वराने लागे नभ चिरूं,
उस्कटल्या अभ्रीं रेंगाळे तांबशी,
धुकें झाल्या जीवीं मुकी कासाविशी.

बेतीं आल्त, २-१०-७६

# विसाव्याचे क्षण

आता विसाव्याचे क्षण माझे सोनियाचे मणी,
सुखें गोवीत ओवीत त्यांची ओढितों स्मरणी.
काय सांगावें नवल! दूर रानींचीं पाखरें
ओल्या अंगणीं नाचतां होती माझींच नातरें.

कधी होती डोळे ओले, मन मानसाची तळी,
माझे पैलांतले हंस डोल घेती त्याच्या जळीं.
कधी पांगल्या प्रेयसी जुन्या विझवून चुली
आश्वासती, "येत्या जन्मीं होऊं तुमच्याच मुली."

कधी उवहून तिळा जुनीं संतांचीं उत्तरें
टाळ-चिपळ्यांत गाती मूळ ओलावल्या स्वरें,
मणी ओढतां ओढतां होती त्यांचींच आसवें,
दूर असाल तिथे हो नांदतों मी तुम्हांसवें.

बेतीं आल्त, २-१०-७६

## चालीमधली वीज कुठे ती ?

चालीमधली वीज कुठे ती, गालांतिल किर्मीज ?
कशी फिकटली अधरावरची शरदविधूची वीज ?

कुठे हरपली नयनांतिल ती नक्षत्रांची फैर ?
अन् गात्रांतिल चापल्याच्या मल्हाराची खैर ?

खळींतलें तें गाभुळ हासूं बसे कसें ग रुसून् ?
फुललेल्या वेलीस कसा गे गेला नाग डसून् ?

भरतीआधी ढळले कैसे अंगलटीचे काठ ?
तुला पाखरा जडली कैसी वहिवाटीची वाट ?

धसमुसळ्या का शृंगाराने गेलिस तूं चुरडून ?
सकाळपारीं कसें झोंबलें दुपारचें तुज ऊन ?

•

फोंडा, २०-१०-७६

# फूलपाखरूं उडूं लागतां

फूलपाखरूं उडूं लागतां मनही माझें उडतें,
मीन उसळुनी जळांत बुडतां मनही माझें बुडतें,
सांजसकाळीं मेघ रंगतां तेंही रंगत जातें,
कुणि एकाकी पक्षी गातां तेंही गात रहातें.

चिंध्यांमधलें मूल हासतां मनही माझें हासे,
काट्यांमधल्या फुलासवें तें टाकी गंध-उसासे,
नक्षत्रांची यात्रा भरतां तेंही जातें यात्रे
अन् रात्रीच्या कवेंत त्यासम पाजळतें क्षणमात्रें.

ज्याने दिधलें मन हें असलें त्याचें मन मज मोही,
तोही घालुनि शीळ ओढितो मजला यमुनाडोहीं.

बेतीं आल्त, ३-१-७७

# निर्झरांच्या गार देशीं

या जगाच्या, या युगाच्या सर्व ओलांडून वेशी
या नदीच्या पार आलों निर्झरांच्या गार देशीं.
येथल्या शब्दांत कैसें तेथलें लावण्य गाऊं ?
येथल्या देहांत कैसें तेथलें तारुण्य साहूं ?
येथल्या ज्वाळांतसुद्धा तेथल्या पाऱ्यांत न्हातों,
येथल्या संगांत साऱ्या तेथल्या रंगीं रहातों.
येथल्या पाण्यामधेही प्राशितों तेथील शांती,
शोषितों येथे उन्हींही तेथली सोमांशु-कांती.
येथल्या पर्जन्यसेकीं ऐकतों तेथील केका,
येथल्या दुःखांस देते नेत्र माझी चित्रलेखा.
येथल्या पुष्पांत नांदी तेथल्या गंधोत्सवाची,
येथल्या प्राणांत फांदी तेथल्या कल्पोद्भवाची.
तेथली सृष्टीच येथे आपुलालें बिंब पाहे,
रश्मिसा राहून बिंबीं मी तिला चुंबून आहें.

पुणे, एप्रिल १९७७

# गुल्मोहर झडतो माथां

गुल्मोहर झडतो माथां : मी सुटत चाललों आता.

झळा जरी आणितो उन्हाळा
सुमपर्णी आगळा उमाळा,
कोकिळ ओती गाढ जिव्हाळा व्याकुळ गातां गातां.

रत्नटीकसें कुणि स्वच्छंदी
फूलपाखरूं जडतें स्कंदीं
त्यासम लय लागुनि स्वानंदीं घुमतो भगवद्गाथा.

भिरीं नभीं परतीच्या वाटे,
सांध्यघनीं कांचन कोंदाटे,
तीर्थोदक नयनांतुनि दाटे जग भगवेपणिं न्हातां.

आता येइल रात्र निराळी
चंद्रकोर लेउनी कपाळीं,
होइल तनु विश्रांत मराळी कवेंत तिचिया जातां.

पुणे, एप्रिल ७७

## पक्ष्यामागून

कुणी निळाकाळा पक्षी गेला गोलांटी घेऊन,
तान्हें मूलसें हासलें पानीं साकळलें ऊन.

गजाअल्याडचें जिणें झालें पल्याडाचें साथी,
लुप्त माझें गीत आलें पांख खोवुनियां माथीं.

पर्जन्याने न्हालें जग हसूं फाकी मोरपंखी,
क्षणीं प्राक्तनाची जाग आली मला एकाएकी.

पंख फुटले प्राणांना, वाट फुटली पायांना,
येतां असेन रडलों पण हासतों जातांना.

पर्वरी, ६–७–७७

# भुईं झाडाविण सुनी

भुईं झाडाविण सुनी, नभ सुनें पक्ष्यांविणें,
मन गीताविण सुनें, चित्त सुनें लक्ष्याविणें.

सृष्टी वृष्टीविण सुनी, वृष्टी सुनी कष्टांविणें,
हातपाय दोन्ही सुने प्राणांतिक निष्ठांविणें.

दुःख मायेविण सुनें, सुख सुनें सख्याविणें,
चत्र प्रवासाची सुनी भल्याबुऱ्या धक्क्यांविणें.

विद्या, कला साऱ्या सुन्या लोकांवरीं गेल्याविणें,
अन्न ताटांतलें सुनें भुकेजल्या दिल्याविणें.

सारा संसारच सुना अग्निशुद्ध प्रीतीविणें,
सारें जिणें गडे सुनें मूक तुझ्या साथीविणें.

पर्वरी, ७-७-७७

## धुळींतलें फूल

सखि, मी कधितरि होइन धूळ,
तूंही कधितरि होशिल धूळ,
तिथेंच पण अपुलें चिरचुंबन
उठेल उमलुनि होउनि फूल.

जीवन अपुलें असेल भूल,
प्रेमहि अपुलें असेल खूळ,
फुलांत पण त्या नव्या उषेचें
खुलेल अळित्याचें पाऊल.

जगरहाटिचा कशास शूल ?
जनकलहाचें मनांत मूळ ?
देऊं-घेऊं प्रेमच, जाणुनि
शिशिरीं मधुऋतुची चाहूल.

फूल जरी निमिषाची हूल,
तिरपीनें होईल मलूल,
क्षण-स्मितें तरि सावरील तें
जगांत गोंधळलेलें मूल.

पर्वरी, १०-७-७७

## आला ग श्रावण

आला ग श्रावण, आला ग श्रावण सृष्टीचा लावण्यराज,
मोतिया वृष्टीला घेऊन सोबत लेऊन सुवर्णसाज.

पाकोळ्या उडाल्या पताका होऊन, झाडेंच झाल्या गुढ्या,
चंदेरी चाळांचे सुनील ओहळ घालीत आले उड्या.

मदनें सोडिले कुसुमबाण इंद्राचें घेऊन धनू,
ओलेतें ऊन हें डोळयांचें पारणें, पौषाचें चांदणें जणू.

पर्वरी, ११-७-७७

# वेदनेची वारुणी

ये, सख्या, घे ही पुराणी वेदनेची वारुणी :
आळली ज्वाळाच पात्रीं तीव्र पाणी होउनी.

औटवेढ्या नागिणीची साठली येथे तृषा,
कालच्या तैशा उद्याच्या गोठल्या येथे उषा.

या अशा ज्वाळेंत ओल्या पोळले जे जे कुणी
जाहले ते दिव्य तारे आपुल्या भस्मांतुनी.

भस्मदीप्तीने तयांच्या रे, हिची वाढे नशा,
घोट घेतां लौकिकाच्या लोपती साऱ्या तृषा.

या चवीला तोड नाही, अप्सरा साऱ्या फिक्या,
रे, हिच्यावाचून साऱ्या अष्टसिद्धी पोरक्या.

घे जरा, लाजूं नको तू, लाज घाली कुंपणें,
प्रत्ययाचे बोल माझे, अंतरींचें सांगणें.

घोट घे निःशंक तू रे, हें त्रिशंकूचें जिणें,
जाळुनी तें फेड आता संचिताचें पारणें.

रे, चिता होतां जिण्याची ती जगा शोकान्तिका,
सेवितां ही तीच होते आगळी संगीतिका.

याचसाठी गुह्यगेहीं मीं तुला या ओढिलें,
या अशा पात्रीं क्षराच्या अक्षराला कोंडिलें.

पर्वरी, २३-७-७७

# रूपकळा

प्रति एक झाडा, माडा त्याची त्याची रूपकळा,
प्रति एक पाना, फुला त्याचा त्याचा तोंडवळा.

असो पाखरूं, मासोळी, जीव, जिवार, मुंगळी,
प्रत्येकाची टेवठेव कांही आगळीवेगळी.

असो ढग, असो नग, त्याची अद्भुत रेखणी,
जी जी उगवे चांदणी तिच्या परीने देखणी.

उठे, फुटे जी जी लाट तिचा अपूर्वंच थाट,
फुटे, मिटे जी जी वाट तिचा अद्वितीय घाट.

भेटे जें जें त्यांत भरे अशी लावण्याची जत्रा :
भाग्य केवढें ! आपुली चाले त्यांतूनच यात्रा !

पर्वरी, ४-८-७७

## फलश्रुती

घोटला अंधार जो त्याने नवे तारे दिले,
पेलिला पर्जन्य जो त्याने धुमारे आणिले.

घेतले अंगार झाले हीं प्रसादाचीं फुलें,
भेटले निःसंग त्यांनी भस्म भाळा लाविलें.

हिंडलों ज्या डोंगरीं त्यांनीच नेलें मंदिरीं,
कंदरीं तेजाळलीं जीं काजव्यांच्या झुंबरीं.

मूर्तिच्या जागीं शिळा ज्या काजळाच्या पाहिल्या
त्यांत मीं विद्युत्प्रभेच्या दिव्य ओळी वाचिल्या.

नाकळे कोण्या कळेने ही लिपी मीं जाणिली,
जोड का जन्मांतरींची आसवांनी आणिली !

आतल्या एकान्तडोहीं गात आता डुंबतों,
अर्थ शब्दांचा उदेतां विस्मयाने थांबतों !

बेतीं आल्त, १-९-७७

# सरतां अज्ञातवास

विझलेले सूर पुन्हा कंठीं मम रुतले रे,
करिंच्या राखेंत नवें सजल कमल फुललें रे.

थकलेल्या मज्जांतुन ऊर्जेचा स्पंद पुन्हा,
मरगळल्या पंखांना गगनाचा छंद पुन्हा.

खचलेल्या आशांवर स्तंभ उभे आज नवे,
ध्रुवपूजक त्यांवरती दुग्धधवल स्वप्नदिवे.

हवि गेल्या प्राणांचें नवरविला तेज दुणें,
नवविधुला गुणित कळा व्यथितांच्या अश्रुगुणें.

जळलेल्या भुइवर या मधुऋतुचा रास पुन्हा,
अवघडल्या बिंदूसहि सिंधूचा ध्यास पुन्हा.

मरणांतुनि मन माझें सृजनावर जडलें रे,
सरतां अज्ञातवास सिंहासनिं चढलें रे.

पर्वरी, ६-९-७७

# तया नमो

नमो ऐसा न दिसे कोणी
कोणी दात कोणी लोणी
वेगळा दोन्हीपासोनी । तया नमो
कोणी अरत्राचे अंकिले
कोणी परत्रासी सोकले
द्वयीं अद्वैत देखिलें । तया नमो
कोणी धाकासि गेले बळी
कोणी लोभाच्या लागले गळीं
दोघांहि जेणें खुडिलें मुळीं । तया नमो
कोणी षड्रिपूंचे पांगिले
कोणी जोगड्यांमागे लागले
जेणें षड्रिपु सन्मित्र केले । तया नमो
कोणा सारा संसार भारा
कोणा कारा गृहपुत्रदारा
ज्या मोरा तो नृत्यपिसारा.। तया नमो
कोणी कर्दमींचे दर्दुर
कोणी सरोवरींचे जळचर
पूर्णपद्मींचा विरळा भ्रमर । तया नमो
कोणा देव राय-राउळीं
कोणा तोचि धन-देउळीं
ज्या तो आपुल्या दशांगुळीं । तया नमो

बोरी, १७-९-७७

# हिप्पिणी

ढासळत्या बुरुजांवर कोसळती लाटा,
दहिं फुटल्यागत कांही फेसाळति काठा,
पुनवेचा चढवि चंद्र स्फटिकावर पारा,
पुळणींतुन मंद फिरे मत्स्यगंध वारा.

गजबजत्या माडांतुन गजगजते गाज :
यक्ष नशेबाज कुणी वाजवि पखवाज,
सामसूम—सिंधु मात्र लक्ष फणा काढी,
काजळ-होडींत दूर झुलतो नावाडी.

'बिकिनी'तिल गौरांगिनि कुणि कातळकोनीं
ओठांनी निमुट टिपी थेंब थेंब फेणी,
अमलग्रस्त जवळ सखा पातळे उताणा,
रतिविरतींतिल न सुटे तिज ताणाबाणा.

असुनी सौंदर्यगेहिं ती स्वतांत नाही,
चांदण्यांतही तुडुंब होरपळे दाहीं.

पर्वरी, २०-९-७७

# लोकीं पैका झाला बळी

लोकीं पैका झाला बळी,
भला तोच जातो सुळीं,
लंचापंचाची पर्वणी,
पुंडांगुंडां झाली धणी.

अन्नपाण्याची टंचाई,
चैनीपायी गर्दी-घाई.
मसणींही दाटीवाटी,
वाव सर्वांच्याच पाठीं.

मोडीमध्ये निघे घर,
खाणें तेंहि तिठ्यावर,
लेका बाप झाला जड,
सुने सासवेची नड.

भाऊ भावाला पारखा,
जो तो हिशेबांत पक्का,
कष्ट नक पैका हवा
हीच जेथे तेथे हवा.

पैका ठाकतां तोंडाशीं
घोंडासुद्धा तोंड वासी,
पैक्यापायीं खोटेंनाटें,
सारें जिणें उफराटें.

## हिप्पिणी

ढासळत्या बुरुजांवर कोसळती लाटा,
दहिं फुटल्यागत कांही फेसाळति काठा,
पुनवेचा चढवि चंद्र स्फटिकावर पारा,
पुळणींतुन मंद फिरे मत्स्यगंध वारा.

गजबजत्या माडांतुन गजगजते गाज :
यक्ष नशेबाज कुणी वाजवि पखवाज,
सामसूम—सिंधु मात्र लक्ष फणा काढी,
काजळ-होडींत दूर झुलतो नावाडी.

'बिकिनी'तिल गौरांगिनि कुणि कातळकोनीं
ओठांनी निमुट टिपी थेंब थेंब फेणी,
अमलग्रस्त जवळ सखा पातळे उताणा,
रतिविरतींतिल न सुटे तिज ताणाबाणा.

असुनी सौंदर्यगेहिं ती स्वतांत नाही,
चांदण्यांतही तुडुंब होरपळे दाहीं.

पर्वरी, २०-९-७७

## लोकीं पैका झाला बळी

लोकीं पैका झाला बळी,
भला तोच जातो सुळीं,
लंचापंचाची पर्वणी,
पुंडागुंडां झाली धणी.

अन्नपाण्याची टंचाई,
चैनीपायी गर्दी-घाई.
मसणींही दाटीवाटी,
वाघ सर्वांच्याच पाठीं.

मोडीमध्ये निघे घर,
खाणें तेंहि तिठ्यावर,
लेका बाप झाला जड,
सुने सासवेची नड.

भाऊ भावाला पारखा,
जो तो हिशेबांत पक्का,
कष्ट नक पैका हवा
हीच जेथे तेथे हवा.

पैका टाकतां तोंडाशीं
धोंडासुद्धा तोंड वासी,
पैक्यापायीं खोटेंनाटें,
सारें जिणें उफराटें.

पोराआधी धावे वार
असा झाला व्यवहार.

पुणे, १६–१–७८

# तूं सुखीं गे ऐस राणी

तूं सुखीं गे ऐस राणी,
लोचनीं आणीं न पाणी,
स्वप्निंची चित्रावलीशी
ती तुझी माझी कहाणी !

प्राक्तनाची रेघ नेते
पाउलें तेथेच जाती,
दोन पक्षी दोन वृक्षीं,
दोन नीडें दो ठिकाणीं !

तूं तुझें गा गीत पानीं,
मीहि गातों फिरें रानीं,
एक गे होतील व्योमीं
आपुलालीं दोन गाणीं !

क्रूस गीतांचा असा हा
जोडलेला तारकांनी
पाहुनी न्हाणील कोणी
अमृताच्या आसवांनी.

बेतीं आल्त, १२-७-७८

# ऋतु हिरवा

संध्येचा पट उपडा,
नील बना सोनकडा,
बैस जरा, आज धरा
पाचूंचा पट उघडा.

गिरि, ओहळ गाढ निळे,
फिटले अपुलेहि पिळे,
चाफेकळि, ये जवळी,
बघु मिथुनोत्सुक बगळे.

चुरल्यागत सखि मरवा
मिरमिरते तरल हवा,
ये कवेंत, या हवेंत
यासम नच ऋतु हिरवा.

बेतीं आल्त, ८-८-७८

## काजवे

नको म्हणूं झाले फार आज घरांत काजवे :
जाण भाग्यानेच आले दिवे हिरवे हिरवे,
आपुलाल्या महालांत होती डोलणाऱ्या हंड्या,
पावसाळी काळोखांत ज्योती ढाळितात थंड्या.

राव माझ्यापुढे रंक, दीन तुझ्यापुढे राणी,
तुझ्या माझ्या शृंगाराला बघ शृंगारिलें त्यांनी,
अशा वेळीं सांग कसे तुझे पेंगुळती डोळे?
जादुगार पावसाचे दिवेसुद्धा असे ओले!

गडे रात गारव्याची, तूं-मी जोडी पारव्यांची,
जाग जरा, आम्हांसाठी रांग लागली दिव्यांची.

बेतीं आल्त, ८-८-७८

# माझे आई बहिणाई

माझे आई बहिणाई तुझ्या मुखें देव बोले,
बोल तुझे गातां गातां माझे पाझरती डोळे.

चूल, जातें, शेत, औत, वीट, रहाट वा मोट,
कसें वाचिलेंस त्यांत सारें गीता-भागवत ?

ठेचेसवें तुला धोंडा बोले, "सांभाळ पाऊल",
वार्ता माहेराला नेते साळू लागतां चाहूल.

तुझ्या बाळाकडे नाग बाळ होउनियां खेळे,
कसे लाविलेस साऱ्यां असे वैकुंठींचे लळे ?

तुझ्या साध्या सोप्या शब्दीं कशा पालवती श्रुती ?
जाग लागतांच कशीं हात जोडतात पातीं ?

तुझ्या साध्या उत्तराने योगी होतो निरुत्तर,
नेणिवेंतली शाणीव अशी कशी लोकोत्तर !

देव तुझ्या ओटीं-पोटीं देव तुझ्या कंठीं-ओटीं,
दशांगुळीं उरलेला देव तुझ्या दाही बोटीं.

त्यांनी भरवी गे घास दुधीं मोडून भाकर,
बोलेन त्या अक्षरांत उमटूं दे बीजाक्षर.

बेतीं आल्त, १४-८-७८

# काजळी आभाळ माथां

काजळी आभाळ माथां गर्द होतें मखमली,
स्वाक्षरी मध्ये विधीने कृत्तिकांनी रेखिली,
तेधवां निःशंक गे तू मान स्कंधीं ठेविली,
कोटिकंठें सागराने गायिली मंत्रावली.

गे तुझ्या निःश्वासगंधें धापली राई-मुई,
बैसल्या पाषाणखंडीं मातली जाई-जुई,
कापुराच्या बाहुल्याशा दोन काया पेटल्या,
दोन प्राणांच्या विजेने गे दिशा कोंदाटल्या.

त्या क्षणांची स्वर्णरेखा रेखुनी गेली जिणें,
आजही केशीं तुझ्या गे रेशमाचें चांदणें.

पुणे, १-१०-७८

# ये

व्योम-निळें मन होतां सजणा
स्मरकरुणाघन होउन ये,
कालिंदी-कलहंसा माझ्या
अतल-तलांतुन पोहुन ये.

घनतिमिराचा घुंगट माझा
सुमपंखांनी फाडित ये,
चांदकडांतुन रजतमनोहर
सडा स्मितांचा पाडित ये.

व्यथा तुजमुळे रजनीगंधा :
मोहर त्यांचा उलवित ये,
अंधविकल हें सकल दिगंतर
गंधें त्यांच्या फुलवित ये.

रिमझिम हिमशीतल धारांनी
उरलें मीपण मिटवित ये,
अचलनिरंजन अ-मनसंगमीं
निरांजनोत्सव नटवित ये.

पुणे, १४-१०-७८

# आग लागो जीवना त्या

आग लागो जीवना त्या आग लागो जीवना
नित्य श्वासासारखें जें ना स्मरे नारायणा.

प्राचिच्या ज्याच्या उजेडीं जाग्रणाचें पारणें,
रात्रिच्या गर्भांत ज्याचें पौर्णिमेचें चांदणें,
पारखें जें त्यांतल्या त्याच्या घना-आश्वासना,
आग लागो जीवना त्या आग लागो जीवना.

ज्याचिया रंगोत्सवीं न्हाती सदा साही ऋतू,
आतल्या गंधें मरंदें मातुनी जाती उतूं,
त्यांचिया स्पर्शें न गातें वा न घेतें सांत्वना,
आग लागो जीवना त्या आग लागो जीवना.

पैंजणें ज्याच्या पदींचीं सर्व हीं तारांगणें
अन् नखाग्राहून ज्याच्या विश्व सारें ठेंगणें,
ना कळे ज्या ताल त्याचा, आकळेना प्रेरणा,
आग लागो जीवना त्या आग लागो जीवना.

पाहतों तेथें तयाचा स्पंद आहे देखणा,
तो दुणावे अमृतानें, जाणतां त्याच्या खुणा,
नोळखे प्राणांत त्यां जें, व्यर्थ भोगी यातना,
आग लागो जीवना त्या आग लागो जीवना.

कलंगूट, ३०-११-७८

# नातें

पिकलेलें सखि ! अपुलें नातें
सोनपावसीं न्हातें,
अंगणांतलें तृणपातेंही
गगनरागिणी गातें.

शरदांतिल ओढ्यासम निर्मल
तुझा नि माझा ओढा,
चार तपांनंतरही तूं मज
सोळांचीच नवोढा.

वनपर्वांतिल स्मृतिगुंफांतुन
अजुन झुळझुळे पावा,
तुझ्या मठीच्या वटछायेतळिं
जगत्रयास विसावा.

इथेच सखि ! तीर्थाटन घडुनी
सफळ सुखी मावंदें,
गळ्यांतलीं मोगरीं उधळुनी
लाजविलें गोविंदें.

पणजी, २६-३-७९

# मी चुकलें त्याच्या गावा

मी चुकलें त्याच्या गावा
तरि तोच जिवास विसावा
सखि, तोच जिवास विसावा

कालच न्हालें
सौरी झालें
दिठिंत निळा दिष्टावा
सखि, तोच जिवास विसावा

माथां बिंदी
मन कालिंदी
जळिं चांदण-शिडकावा
सखि, तोच जिवास विसावा

तनुचा अणुअणु
वाजे रुणुझुणु
अष्टदिशांतुन पावा
सखि, तोच जिवास विसावा

स्वरांतुनी हरि
साठवुनी उरिं
डोळे मिटुन पहावा
सखि, तोच जिवास विसावा

मिरज, २७-४-७९

## तूं शहाणी

तूं शहाणी जाणसी द्यावें हसूं केव्हा किती
बोलणें अन् वागणें ही जोखुनी त्यांची रती.

अत्तराची कूपिकाशी प्रीति तूं सांभाळिशी,
एक फावा देउनी तूं व्योम केशीं माळिशी.

जाळ गंधें पेरण्याची साधिली कैशी तऱ्हा ?
मंद अस्ताईच झाली जीवघेणा अंतरा !

या तुझ्या गे कौशलाने धूपसा मी पेटलों :
नष्ट होतां, सृष्टिजातीं मातुनी कोंदाटलों.

खेद नाही होमल्याचा : मीं मला ओलांडिलें,
अल्पसें कुंकू तुझें राखेंत माझ्या सांडलें !

बेर्तीं आल्त, २३-६-७९

# येइं घना येइं घना

येइं घना, येइं घना ! अजुन पुन्हा, अजुन पुन्हा :
चाहुल लागून तुझी हर्ष वना, विहगजना.

बकुळतळीं गंधखुणा, ओलें सुखस्वप्न उन्हा,
रोमांचित धरणीतल, पवनाला पोरपणा.

येइं घना, येइं घना ! अजुन पुन्हा, अजुन पुन्हा :
प्यास तुझी, आस तुझी तान्ह्या अतितृष्ण तृणा.

ध्यास तुझा, भास तुझा कणसांतिल बाळकणा,
येइं घना, येइं घना ! अजुन पुन्हा, अजुन पुन्हा.

बेतीं आल्त, २४-७-७९

# मीच नेणतों माझ्यामधलें

मीच नेणतों माझ्यामधलें
वाद्य कोणतें कधी स्रवेल,
स्वरावरी अन् वृत्ति कोणती
चढेल होउनि चांदणवेल.

मीच नेणतों मनःसरीं मम
किती युगांतिल पोहति कोण,
स्वप्न कुणाचें कुण्या कळेने
तिच्या फुलांचे भरितें द्रोण.

मीच नेणतों मला अजाणा
कसे भारिती उडुगणभास,
मिटल्या नयनिंहि कसा उमलतो
इंद्रधनुर्भव दिव्य प्रकाश.

मीच नेणतों कोण, कुठिल मी,
कसा रसोत्सविं बुडतों खोल,
जरेंतदेखिल माती माझी
कशी तयांची धरिते ओल.

बेर्तीं आल्त, २७-७-७९

# कणसा आलीं श्रावण-शेतें

कणसा आलीं श्रावण-शेतें,
नीलमण्यासम पाणथळी,
लग्नसोहळ्यांतल्या होवळ्या
तद्‌वत सजल्या वनस्थळी.

जिथे पहावें तिथे मनोरम
विलसे रंगोत्सव हिरवा,
सुखद गारवा, हवेंत मरवा,
यासम न दुजा ऋतु बरवा !

शिळांस पाझर, झुळुझुळु निर्झर,
कातळदेखिल हिरवळले,
खग गुणगुणती, पशु हुंबरती,
कीटक मखमलिने नटले.

हसत उतरलीं नव्या फुलांवर
फुलपंखांचीं देवकुळें,
चरण चुंबितां मुखीं फुलांच्या
चंद्रोद्‌गमसम स्मित उमले.

उन्हांत जरतारी जलधारा :
स्फटिकमहालीं लक्ष दिवे,
स्वर्गधरेच्या शुभमंगलिं या
गळ्यांत माझ्या गीत नवें.

सुंबई, १६-८-७९

## गीत माझें गायलों मी

गीत माझें गायिलों मी रंगलेल्या ऐलकाठीं
पेटलेलें पैल तेव्हा थांबलें माझ्याचसाठी.

गीत ओलावीत गेलें जाणिवेच्या लक्ष वाटा :
थाटमाटीं त्याचिया आलीस तूं माझ्याचसाठी.

बोलतां कांही दिवाणें ओठ ओलें फूल झाले,
केवडा डोकावला काऱ्यांतुनी माझ्याचसाठी.

दृष्ट खोटी लागली अन् फूल तें निर्माल्य झालें :
झाकलेला गंध त्याचा फाकला माझ्याचसाठी.

ऐल रंगांचें उडालें, पोचलों मी पैलकाठीं,
थांबली होतीस गे तेथेहि तूं माझ्याचसाठी.

मुंबई, १९-८-७९

## ती तुझी स्मितरेघ

ती तुझी स्मितरेघ जेव्हा शाश्वता स्पर्शून आली
आणि पाणी चांदण्याचें थांबली शिंपीत गालीं.

कोण तूं, कुठली, कुणाची ? ना पुसूं सुचलेंच कांही,
मी असा विस्तारलों की आपुला उरलोंच नाही.

भोवतीचें विश्व सारें इंद्रधनुरंगांत न्हालें,
वाळल्या गवतासमुद्धा रेशमाचें फूल आलें.

रेघ ही सुकुमार माझ्या पावलां फुलवाट झाली,
अंतरिक्षांतील गीतें पाखरें होऊन आलीं.

पुणे, २१–३–८०

# गर्द असुनि ही इतुकी झाडी

गर्द असुनि ही इतुकी झाडी कां न इथे पाखरूं ?
कुरणें हिरवींगार असुनिही सुनेंच कां लेकरूं ?
प्रशस्त असुनी प्रदीर्घ रस्ते कसें न फिरके कुणी ?
क्वचितच गाडी पळते कां ही तानेपरि तळपुनी ?
इतुकीं बैठीं घरें अशीं कां मुकाट डोळे मिटून ?
शीळ घालुनी जातो वारा कोठे कोणीकडून ?
गुप्त जाहला सूर्य तरि कसा पांडुर असा उजेड ?
कसें फुलांना मधुगंधांहुन घनरंगांचें वेड ?
कुंभक करुनी का शिवशंकर निश्चल इथे समोर ?
कोर तयाची स्रवतां मी कां स्वादनिमग्न चकोर ?

लुइव्हिल, ४-६-८०

# जल-द तलावाकाठीं

जल-द तलावाकाठीं मधुरे, पडल्या अपुल्या गांठी !

शुद्धिसदन इसवी मंदिरसें,
तरुराजीला हरित बाळसें,
पंथचतुष्टय उंच भोवती सुखसहलीच्यासाठी.

मित वसनीं तूं द्रुत पळतांना,
बघुनि मला किंचित हसतांना,
झाली तुझिया पोटींपाठीं सायंकांचनदाटी.

दैनिक अपुल्या स्मितसंवादीं
झाली हृन्नाट्याची नांदी,
तूं आनंदी, मी आनंदी तटुनी अमृत ओठीं.

लुइव्हिल, ७-६-८०

## सांत्वन

गे नको चित्तीं उगळूं सोसल्याचा कोळसा,
फासुनी काचेस पारा ती गणावी आरसा :
व्योम जें भिंगांत बिंबे तें म्हणावें आपुलें,
येथल्या गे ओखटींही कांहि वाहे चांगलें.

सैल एखाद्या क्षणाला जीभ दांतीं सापडे :
नेणुनीही क्लेश देतें गे स्वतःचें आतडें,
प्रेमसुद्धा पाश होतां पंख तोडी आपुले,
झापडीं घालून नेत्रां व्योम पाडी आंधळें.

मोकलोनी पाश ते गे होत जाऊं मोकळे,
आपुला संसार झाला, दीस थोडे राहिले,
सोसल्याने शब्दसिद्धी आपुल्या आशीर्वचीं,
तृप्त चित्तें देउनी तीं मुक्तिची सेवूं रुची.

लुइव्हिल, १०-६-८०

## निळा निळा दीस

निळा निळा दीस सोन्याच्या उन्हाचा,
गवताचा वास सातां योजनांचा,
लवलवे पानीं पारजाचें पाणी,
पाखरांचा हर्ष उसळे थव्यांनी.

अकस्मात फुलीं बाळकांचे डोळे
काळेनिळे भोळे वाटोळे वाटोळे,
पाकोळ्यांना जाग : अधांतरीं बाग,
रंगांचा उत्सव चाले जागोजाग.

धरतीला लागे पाचवा महिना,
वैशाखांत येथे श्रावणाच्या खुणा.

लुइव्हिल, ११-६-८०

# समुद्र बिलोरी ऐना

समुद्र बिलोरी ऐना
सृष्टीला पांचवा म्हैना

वाकले माडांचे माथे,
चांदणें पाण्यांत न्हातें,
आकाशदिवे लावीत आली
कार्तिक नौमीची रैना.

कटीस अंजिरी नेसूं,
गालांत मिस्किल हसूं,
मयूरपंखी, मधुर डंखी
उडाली गोरटी मैना.

लावण्य जातसे उतूं,
वायाच चालला ऋतू,
अशाच वेळीं गेलीस कां तूं
करून जिवाची दैना ?

आंबोली घाट, २२-१०-८०

## कांहीं अभंग

. १ .

संधिप्रकाशांत अजून जों सोनें
तों माझीं लोचनें मिटों यावीं;

असावीस पास, जसा स्वप्नभास,
जीवीं कासावीस झाल्याविण;

तेव्हा सखे आण तुळशीचें पान,
तुझ्या घरीं वाण त्याची नाही;

तूच ओढलेलें त्यासवें दे पाणी,
थोर ना त्याहुनी तीर्थ दुजें;

रंभागर्भी वीज सुवर्णाची कांडी
तशी तुझी मांडी देईं मज;

वाळल्या ओठां दे निरोपाचें फूल:
भुलीतली भूल शेवटली;

जमल्या नेत्रांचें फिटू दे पारणें,
सर्व संतर्पणें त्यांत आलीं.

बोरी, ११-७-७३

. २ .

जगीं कैक झाले कवी :
ज्याला भावे त्याला चवी;
बोल निघाले जे ओठीं
नेणें कैसे, कुणासाठी !

फुलीं डवरली वेल,
दिला वारियाने झेल;
रस गोठला हो देठीं,
कत्र वाली जगजेठी.

बोरी, २-५-७४

. ३ .

त्याची मज बाई सोडवेना ओढ;
लाडीगोडी, भीड मोडवेना.

दृष्टीनेच मज बांधिलें खांबाला,
प्राण हा काढिला वेणुनादें.

अशी मी संसारीं नांदूं तरी कशी ?
पार वेडीपिशी जगीं ठेल्यें !

ध्यातां त्यातें माझें विसरलें नाव,
शोधूं गेल्यें गाव सापडेना.

पारखाया मज पाहिलें दर्पणीं :
रूपाची रेखणी आढळेना.

असें कसें झालें चेटूक साजणी ?
आता वेणीफणी काय कामा ?

बोरी, २-५-७४

. ४ .

नाड्यावरी चाले जशी सोनचेडी
तशी माझी नाडी चालवी तू.

गर्दीच्या आरोळ्या ऐकूं नेदी कानीं
किंवा तृत ध्वनि टाळियांचे.

दिसों नेदी डोळां प्रकाश वा दिशा,
घेतलेली रेषा सुटों नेदी.

खुर्चीचे खाविंद करूं देत सौदा;
तूं मात्र गोविंदा सांडूं नको.

बोरी, २-५-७४

. ५ .

नाही माझी कांही कागाळी तक्रार:
सारा माझा भार घेतलासी.

जन्मतांच कंठीं घातलीस वीणा
तेणें आले गुणा जन्मदोष.

जिवासवें झाला कायेचाही कल्प,
झालों सुखरूप रूपोत्सवीं.

वरींच घातली माझ्या बाळ-कानीं
आर्त भक्तवाणी उमाळ्याची.

भजनांत तुझी मूर्ती होतां जिवी
नेणतां आसवीं न्हाणिली मीं.

. ६ .

वसतीला येतां गोसावी, बैरागी
त्यांची सेवा सांगी केली भावें.

दुखावतां सलें बोललों झाडांशी,
चंद्राशी, फुलांशी, पाखरांशी.

बोलांत दाटले सूर, राग, ताल,
झोंबलेले व्याळ प्रेम व्याले.

धुळाक्षरें झालीं साहित्याचीं दारें,
शारदेचें वारें संचारलें.

स्वरीं जें जें आलें झालें चित्ररूप,
छंदांत अरूप धूप झालों.

बोरी, ४-५-७४

. ७ .

पहाट ढाळिते प्रकाशप्राजक्तें
माणकें मौक्तिकें वेच रया

शिळावलें पाणी आरशाचें पान
शांतीचें स्तवन वाच रया

अंधाराचे माथीं स्फटिकाचा दिवा
शिल्पाचा रेखावा देख रया

वारियाचे घरीं गंधाचीं तोरणें
कवण्या कारणें जाण रया

जागें झालें तृण करी मुका जप
आपुलें स्वरूप मोख रया

मडगाव, २९-९-७५

. ८ .

अनायास फिटे ऐहिकांची आस,
राहिला प्रवास थोडा आतां.

चालविला भला सारा योगक्षेम,
दिलें स्नेहप्रेम गेलों तेथे.

पोटा आलियांतें पुरविले पंख,
आभाळीं निःशंक केलें तयां.

घडविली पैक्याविणें तीर्थावळ,
संतकृपाबळ सोपें केलें.

शाणीवेवाचून दिधली जाणीव,
तेणें माझा जीव सुखविला.

रणींच्या घावांच्या नुरों दिल्या मावा,
नाही हेवादावा शिवूं दिला.

करून घेतलें कांही लोककाज,
ऐसें केलें चोज सुकृताचें.

ठेविलें यशांत अहंतेवेगळें,
अपेशीं राखिलें श्रद्धाबळें.

हिशेबावांचून जमविला ताळा,
अनृणी गोपाळा केलें मज.

बेतीं आल्त, ८-७-७९

.९.

आयुष्याची आता झाली उजवण,
येतो तो तो क्षण अमृताचा.

खडे, गोटे मज झाले चिंतामणी,
दिसे तें तें पाणी गंगोदक.

लवे वृक्षवल्ली : कल्पद्रुमावली,
इंद्ररंगावळी मेघमाळा.

वेल्हाळ पाखरें : गंधर्व-किन्नरें,
वाहनें वनचरें अमरांचीं.

जें जें भेटे तें तें दर्पणींचें बिंब :
तुझें प्रतिबिंब लाडेंगोडें.

उमटल्या शब्दीं नवीन पहाट,
पावलांत वाट माहेराची.

अंतर्बाह्य आता आनंदकल्लोळ,
श्वासीं परिमळ कस्तुरीचा.

सुखोत्सवीं अशा जीव अनावर :
पिंजऱ्याचें दार उघडावें.

बेतीं आल्त, ९-७-७९

. १० .

रुचे तें तें करीं : सारा भार तुझ्यावरी,
जन्मांचा विकला मी तों तुझाच पांगला.

सोशिलें अपार, तूंच घातलेंस पार,
दुःखाचे शेवटीं दिठी दिलीस गोमटी.

आळवीन गाथा वीज पडलिया माथा,
राखेची विभूत तुझा प्रसाद अद्‌भुत.

पुणे, १५-२-८०

. ११ .

जरेसवें व्याधी हे तो देहाची उपाधी,
आहें मी सचेत हाही तुझाच संकेत,
भली तुझी कळा : व्यथा प्रयोगाची शाळा,
अंतरींचें न्यून घ्यावें विस्तवीं लासून,
असें व्हावें चोख तुझी ग्यानबाची मेख.

पुणे, १५-२-८०

REFBK-0023405
REFBK-0023405

. १२ .

डोळ्यांत प्रकाश पावलापुरता
अंतरींचा दाता देत राहे.

तहानेला वाहे कृपावंत झरा :
पितां नाही जरा शीण कांही.

शिंपल्यासारखी स्वयें मिटे भूक
यापरतें सुख काय आहे ?

चाल तूं आपुल्या प्राक्तनाची वाट :
शेवटींची पहाट वाट पाहे.

लुइव्हिल, ९-८-८०

ग्रंथालय ठाणे
२७३९
२३७०५
काव्य